POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-११२ ● मुंबई, सोमवार, २४ नोव्हेंबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## मध्य प्रदेशात धडक कारवाई

### बेकायदेशीर शस्त्रनिर्मिती आणि तस्करी रॅकेटचा पर्दाफाश



**‘पुरवठा साखळी’चा मोठा धागा**

पुण्यात जप्त झालेल्या २१ पिस्तुलांच्या पुरवठ्याचा शोध घेत असताना सर्व धागे मध्य प्रदेशातील शस्त्रनिर्मिती केंद्रांकडे पोहोचत होते. पुण्यात अटक करण्यात आलेल्या काही गुन्हेगारांच्या चौकशीतून ही माहिती स्पष्ट झाली. “ही एक मोठी पुरवठा साखळी आहे. या शस्त्रांचा प्रवास मध्य प्रदेशातून सुरू होऊन महाराष्ट्रातील विविध ठिकाणांपर्यंत पोहोचत होता. आणखी किती लोक या रॅकेटमध्ये सामील आहेत याचा शोध घेणे सुरू आहे,” असे पुण्याचे सहपोलिस आयुक्त रंजन कुमार शर्मा यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

मध्य प्रदेशातील बडवानी जिल्ह्यातील एका दुर्गम गावातून चालवल्या जाणाऱ्या मोठ्या आंतरराज्यीय बेकायदेशीर शस्त्रनिर्मिती आणि तस्करी रॅकेटचा पुणे पोलिसांनी धडक कारवाई करून पदार्फाश केला आहे.

या सापळ्यात तब्बल ३६ जणांना ताब्यात घेण्यात आले असून मोठ्या प्रमाणात पिस्तूल, दारूगोळा आणि शस्त्रनिर्मितीचे साहित्य जप्त करण्यात आले आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

**उमर्ती गावातील भट्ट्यांवर संयुक्त धडक**

गेल्या तीन आठवड्यांत पुण्यात संशयास्पद हालचालीदरम्यान अनेक पिस्तुलांची जप्ती झाल्यानंतर पोलिसांनी तपासाची मोहीम राबवली. त्यातून बडवानी जिल्ह्यातील उमर्ती गावात गुप्तपणे शस्त्रे तयार केली जात असल्याचा धागा मिळाला. त्यानंतर पुणे पोलिसांनी मध्य प्रदेश पोलिसांशी संपर्क साधून संयुक्त छापेमारी मोहीम आखली. या कारवाईत बेकायदेशीर शस्त्रे तयार करणाऱ्या तब्बल ५० भट्ट्या उद्ध्वस्त करण्यात आल्या. या भट्ट्यांमधून आधुनिक पद्धतीने देशी पिस्तुले तयार करून ती विविध राज्यांत, विशेषतः महाराष्ट्रातील गुन्हेगारी गटांना पुरवली जात असल्याचा संशय आहे.

**१०५ पोलिसांचे पथक मोहिमेत सहभागी**

या संयुक्त कारवाईचे नेतृत्व डीसीपी सोमय मुंडे यांनी केले. पुण्यातील विविध विभागांतील १०५ पोलिस अधिकारी व कर्मचारी या मोहिमेत सहभागी झाले होते. स्थानिक मध्य प्रदेश पोलिसांच्या मदतीने अनेक ठिकाणी एकाच वेळी छापे घालण्यात आले.

**चौकशी अजूनही सुरू**

या रॅकेटमधील शस्त्रांचे अंतिम ग्राहक, वाहतूक साखळी आणि वित्तपुरवठा करणाऱ्या टोळ्यांचा शोध सुरू आहे. पोलिसांना या प्रकरणात आणखी मोठे जाळे उघड होण्याची शक्यता वाटत आहे.

## पाकने ड्रोनद्वारे पाठवलेला शस्त्रसाठा दिल्ली पोलिसांकडून जप्त

■**नवी दिल्ली। प्रतिनिधी,**

भारतामध्ये दहशत पसरवण्याचा पाकिस्तानचा डाव दिल्ली पोलिसांनी उधळून लावला आहे. दिल्ली पोलिसांच्या गुन्हे शाखेने आंतरराष्ट्रीय शस्त्र तस्करी रॅकेटचा पदार्फाश केला असून ड्रोनद्वारे तस्करी करण्यात आलेल्या हत्यारांचा साठा जप्त केला आहे.

या तस्करी रॅकेटमध्ये सहभागी असलेल्या चौघांना पोलिसांनी अटकही केली आहे. ड्रोनचा वापर करून ही हत्यारे पंजाब सीमेवरून हिंदुस्थानात आणण्यात आली होती. येथे ती लॉरेन्स बिश्नोई, बंबीहा, गोगी आणि हिमांशु भाऊ या टोळ्यांना पुरवण्यात येणार होती. मात्र तत्पूर्वीच दिल्ली पोलिसांच्या पथकाने ही शस्त्रास्त्रे जप्त केली, अशी माहिती पोलिसांनी दिली. जप्त केलेल्या हत्यारांमध्ये




१० विदेशी सेमी-ऑटोमेटिक पिस्तूल, ९२ जिवंत काडतुसांचा समावेश आहे. ही तुर्की बनावटीची पीएक्स ५.७ पिस्तूल असून याचा वापर स्पेशल फोर्स करते. तसेच जप्त केलेल्या हत्यारांमध्ये चिनी बनावटीची पीएक्स ३ ही पिस्तूलही आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली.

दरम्यान, अटक केलेले आरोपी पंजाब आणि उत्तर प्रदेशचे रहिवासी आहेत. दिल्लीतील रोहिणी परिसरात छापा टाकून पोलिसांनी आरोपींना शस्त्रास्त्रांसह बेड्या ठोकल्या आहेत. सापळा रचून आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांची कसून चौकशी सुरू आहे.

**जम्मू-काश्मीरमधून ताब्यात**

दिल्ली स्फोटप्रकरणी जम्मू-काश्मीरमधील एका इलेक्ट्रिशियनला तपास यंत्रणांनी ताब्यात घेतले असून त्याचा जैश-ए-मोहम्मदशी संबंध असल्याचा संशय आहे. राज्य तपास यंत्रणा आणि जम्मू-काश्मीरच्या विशेष ऑपरेशन्स पथकाने ही कारवाई करत पुलवामा येथे काम करणाऱ्या तुफैल अहमद याला चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. तो मूळचा श्रीनगरचा रहिवासी असून या कटात त्याचा सहभाग असल्याचे पुरावे आढळले आहेत. णि सोशल मीडिया वापरून त्यांच्या लिंक्सचाही तपास करत आहेत.

## ‘ऑपरेशन सिंदूर’ची माहिती आयएसआयएसला पाठवणाऱ्या २ अल्पवयीनांना अटक

**डिजिटल प्रशिक्षण आणि डार्क-वेब**

या अल्पवयीन मुलांना 'डिजिटल मॉड्यूल' द्वारे प्रशिक्षण दिले जात होते. यामध्ये डार्क वेब, टीओआर, व्हीपीएन आणि बनावट आयपी अॅड्रेस यांसारख्या तंत्रांचा समावेश होता. ही सर्व तंत्रे कट्टरपंथी ऑनलाइनच्या माध्यमातून पुरवली जात होती. कायदा अंमलबजावणी संस्थांना त्यांचा मागोवा घेणे शक्य होऊ नये यासाठी हे प्रशिक्षण दिले जात होते. भारत आणि पाकिस्तानमधील तणावाच्या काळात, पाकिस्तानी हँडलर्सनी अल्पवयीन मुलांशी संपर्क वाढवला. याचदरम्यान, भारताचे 'ऑपरेशन सिंदूर' आणि दोन्ही देशांनी लादलेली 'मीडिया ब्लॅकआऊट'ची परिस्थिती होती. या माहितीच्या दरीचा फायदा घेत हँडलर्सनी मुलांना सक्रिय केले आणि त्यांना हवाई हल्ल्यांच्या नकाशांच्या मिळवून क्लिपिंग्स भारतीय वृत्तवाहिन्यांकडून पाकिस्तानला पाठवण्याची सूचना केल्याचेही तपासात स्पष्ट झाले आहे.

■**रायपूर। प्रतिनिधी,**

छत्तीसगडमधील दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) रायपूर आणि भिलाई येथून दोन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले आहे. दहावी आणि अकरावीत शिकणारे हे दोन्ही विद्यार्थी दहशतवादी संघटना आयसिस हँडलर्सच्या थेट संपर्कात होते. त्यांना ऑनलाइन माध्यमातून कट्टरपंथी सामग्रीद्वारे पद्धतशीरपणे भडकावले जात होते.

मिळालेल्या माहितीनुसार, दोन्ही अल्पवयीन विद्यार्थी शस्त्रे उचलण्यास तयार होते आणि त्यांनी हँडलर्सना 'ऑपरेशन सिंदूर' संबंधित नकाशाची एक क्लिपिंग (नमुना) पाठवली होती. एटीएसने त्यांच्यावर अनलॉफुल ॲक्टिव्हिटीज (प्रिव्हेन्शन) ॲक्ट (यूएपीए), १९६७अंतर्गत गुन्हा दाखल केला असून त्यांच्या कारवायांची सखोल चौकशी सुरू आहे. अल्पवयीन मुलांचे कुटुंब तपास यंत्रणांना सहकार्य करत असून, त्यांच्या मानसिक पुनर्वसनासाठी पावले उचलली जात आहेत, असे छत्तीसगड एटीएसने स्पष्ट केले आहे.

**प्रकरण कसे आले उघडकीस**

एटीएस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, आक्षेपार्ह सोशल मीडियावरील




तक्रारीनंतर हे प्रकरण समोर आले. देखरेखीदरम्यान अधिकाऱ्यांना इसिसशी जोडलेला एक गोपनीय इन्स्टाग्राम ग्रुप आढळला. पाकिस्तानी हँडलर्स कट्टरपंथी सामग्री अपलोड करत होते. हे दोन भारतीय अल्पवयीन मुले या ग्रुपमध्ये सक्रिय सहभागी होते. गेल्या दीड वर्षापासून एटीएसने या अल्पवयीन मुलांवर लक्ष ठेवले होते. डिजिटल देखरेख टाळण्यासाठी पाकिस्तानी हँडलर्स वारंवार ग्रुप्स बदलत असत. ग्रुपमध्ये जास्त ट्रॅफिक आढळले किंवा यंत्रणांची पाळत असल्याचा संशय आला, तर तो ग्रुप अचानक डिलीट केला जात असे.

**जाळ्यात ओढले**

दहशतवाद्यांनी अल्पवयीन मुलांना कट्टरपंथी बनवण्याची ही प्रक्रिया हळूहळू आणि काळजीपूर्वक आखली गेली होती. सुरुवातीला मुलांना प्रेरणादायक आणि सौम्य धार्मिक सामग्रीसह लक्ष्य केले गेले. कालांतराने, त्यांना हिंसक व्हिडीओ, कट्टरपंथी संदेश आणि जिहादी ऑडिओ क्लिप्स दाखवल्या गेल्या. गुप्त ग्रुप्स आणि बनावट खात्यांमधून मुलांना सतत ॲक्टिव्ह ठेवले. सोशल मीडियाव्यतिरिक्त, गेमिंग प्लॅटफॉर्मचाही भरतीसाठी वापर करण्यात आला. अनेक ऑनलाइन गेम्स, विशेषतः शूटिंग किंवा मिशन-आधारित गेम्समध्ये खासगी चॅट रूम्स असतात. पाकिस्तानी हँडलर्सनी या चॅनेल्सचा वापर केल्याचेही तपासात स्पष्ट झाले आहे.

**तपास आणि कुटुंबाचा सहभाग**

छत्तीसगड एटीएसने अल्पवयीन मुलांच्या कुटुंबांना चॅट लॉग्स, स्क्रीनशॉट्स, हिंसक सामग्रीचे पुरावे आणि हँडलर्ससोबतच्या संवादाचे रेकॉर्ड दिले आहेत. आपले मुले एवढ्या मोठ्या प्रमाणात कट्टरपंथी कार्यात गुंतलेले आहेत हे पाहून कुटुंबांना धक्का बसला. आरोपी अल्पवयीन असल्याने, बाल न्याय कायद्यांतर्गत तपास सुरू आहे. मुलांवर कोणताही मानसिक दबाव येऊ नये म्हणून पालकांच्या उपस्थितीत चौकशी केली जात आहे. त्यांना समाजात पुन्हा सामील होण्यासाठी मानसिक समुपदेशन दिले जात आहे.

## मुजम्मिल शकीलची चौकशीत धक्कादायक कबुली
## २०२३ पासून जैशचा भारतात साखळी स्फोट घडवण्याचा कट

**हल्ल्यापूर्वीच सुरक्षा यंत्रणांची कारवाई**

हल्ल्यापूर्वीच दिल्ली पोलिस आणि जम्मू-काश्मीर पोलिसांनी संयुक्त कारवाई करत फरीदाबादमधून तब्बल २,९०० किलो स्फोटक पदार्थ, ३६० किलो अॅमोनियम नायट्रेट आणि क्एऊतयार करण्यासाठी वापरले जाणारे अनेक साहित्य जप्त केले होते. या कारवाईनंतरच शकीलला अटक झाली. या तपासात आणखी एक महत्त्वाचा धागा सापडला असून शकीलचा संपर्क पाकिस्तानस्थित जैशच्या हँडलर ह्यहन्जुल्लाह्नशी सतत होत असल्याचे उघड झाले आहे.

■**मुंबई। प्रतिनिधी,**

दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ झालेल्या भीषण कार स्फोट प्रकरणाच्या तपासात आता धक्कादायक माहिती समोर आली आहे. पाकिस्तानस्थित दहशतवादी संघटना जैश-ए-मोहम्मदशी (खीट) संबंधित 'व्हाईट-कॉलर मॉड्यूल' भारतातील अनेक शहरांमध्ये साखळी स्फोट घडवण्याच्या तयारीत असल्याचे उघडकीस आले आहे. २०२३ पासून भारतात भीषण हल्ला करण्याची योजना आखल्याचे एनआयएच्या तपासात उघड झाले आहे.

एनडीटीव्हीने दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणातील सहआरोपी डॉ. मुजम्मिल शकीलने चौकशीत कबुली दिली असून हा कट २०२३ मध्येच रचला गेला होता आणि गेली दोन वर्षे त्यासाठी तयारी सुरू होती.




लाल किल्ला बॉम्बस्फोटाच्या तपासात हे स्पष्ट झाले, की हा हल्ला मुख्य आरोपी डॉ. उमर नबीने अत्यंत नियोजनपूर्वक केला होता. सहआरोपी शकीलने बॉम्बसाठी लागणारे रसायन, इलेक्ट्रॉनिक घटक, रिमोट्स आणि इतर साहित्य हरियाणातील गुरुग्राम आणि नूंहमधून खरेदी करून फरीदाबादमधील भाड्याच्या घरात अनेक महीने जमवले होते. बॉम्बनिर्मितीसाठी आवश्यक केमिकल प्रक्रियाही केली होती. त्याने २६ क्विंटल एनपीके खते मिळवून मोठ्या प्रमाणात स्फोटक सामग्री तयार केली होती.

‘हन्जुल्ला’ने शकीलला बॉम्ब बनवण्याचे व्हिडिओ पाठवले होते, तसेच हे नावही बनावट असल्याचा संशय आहे. श्रीनगरच्या नवगाम परिसरात गेल्या वर्षी दिसलेल्या जैशच्या पोस्टर्सवर 'कमांडर हन्जुल्ला भाई' असे नावही छापलेले आढळले होते. शकीलचा या हँडलरशी संपर्क शोपियानच्या मौलवी इरफान अहमदमार्फत होत असल्याचीही माहिती समोर आली आहे.

एकूण तपासातून दिल्ली स्फोट हा एक वेगळा हल्ला नसून भारतातील अनेक शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर दहशतवादी हल्ले करण्याच्या व्यापक कटाचा भाग असल्याचे स्पष्ट झाले आहे. एनआयए आता या मॉड्यूलच्या नेटवर्कचा शोध अधिक गतीने घेत असून हा कट कुठवर पसरलेला आहे याचा तपास सुरू आहे.

## केंद्र सरकारचा ५ बिबट्यांच्या नसबंदीला होकार
### राज्य सरकारला हवी तातडीने ११५ बिबट्यांच्या नसबंदीची परवानगी



**...या गोष्टींची दक्षता घ्यावी**

- भविष्यात ही पद्धत राबविण्यासाठी दीर्घकालीन आराखडा तयार करून त्याचा अहवाल मंत्रालयाला सादर करावा
- सर्व टप्प्यांमध्ये पशुवैद्यकीय सेवेची सुनिश्चिती करण्यात यावी आणि संपूर्ण प्रक्रिया अत्यंत काळजीपूर्वक राबविण्यात यावी
- संपूर्ण प्रक्रियेदरम्यान प्राण्यांना किमान त्रास किंवा आघात होईल, याची खात्री करावी
- संपूर्ण कार्यवाहीचे व्हिडीओ चित्रण करण्यात यावे आणि त्याची नोंद मंत्रालयास उपलब्ध करून द्यावी.

■**मुंबई। प्रतिनिधी,**

राज्यातील अहिल्या नगर, नाशिक, जुन्नर आदी भागात बिबट्यांनी हैदोस घातला आहे. मानवी वस्तीत मुक्त संचार, मानवांवर हल्ले यामुळे राज्यात बिबट्यांची दहशत निर्माण झाली आहे. बिबटे आणि मानवी संघर्ष वाढला असून बिबट्यांचे हल्ले रोखण्यासह त्यांची संख्या कमी करणे गरजेचे आहे. यासाठी ११५ बिबट्यांची नसबंदी करण्याची परवानगी तातडीने मिळावी, यासाठी राज्य सरकारने केंद्र सरकारला पत्र लिहिले होते. मात्र केंद्र सरकारने फक्त पाच बिबट्यांची नसबंदी करण्यास अटी शर्तीवर होकार दिला आहे. त्यामुळे राज्यात बिबट्यांचे वाढते हल्ले रोखण्यासह संख्या नियंत्रणात आणणे राज्य सरकारच्या वन विभागासमोर आव्हान उभे ठाकले आहे.

गेल्या काही वर्षांत पुणे, नाशिक अहमदनगर या जिल्ह्यात बिबट्यांचा मानवी वस्तीत वावर वाढला आहे. बिबट्या व मानवी संघर्ष वाढला असून लहानांपासून मोठ्यांपर्यंत बिबट्याचे शिकार होत आहेत. गावा गावात बिबट्याची गावकऱ्यांमध्ये भातीचे वातावरण दहशत निर्माण झाली असून निर्माण झाले आहे. बिबट्यांचे मानवावरील हल्ले रोखण्यासाठी राज्य सरकारच्या वन विभागाच्या वतीने विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. मात्र बिबट्यांची वाढती संख्या लक्षात घेता बिबट्याची पैदास कमी करणे हा मुख्य पर्याय आहे. बिबट्यांची संख्या नियंत्रणात आणण्यासाठी बिबट्यांची नसबंदी करणे गरजेचे असून ११५ बिबट्यांची नसबंदी करण्याची परवानगी मिळावी यासाठी केंद्र सरकारला पत्र लिहिले होते. मात्र केंद्र सरकारने फक्त पाच बिबट्यांची नसबंदी करण्यास मान्यता दिली आहे. त्यामुळे बिबट्यांची पैदास रोखणे राज्य सरकारच्या वन विभागासमोर मोठे आव्हान उभे ठाकले आहे.

२०२२ मध्ये राज्य सरकारच्या वन विभागाने केलेल्या बिबट्यांच्या जनगणनेत सुमारे २,२८५ बिबटे असल्याचे निदर्शनास आले होते. गेल्या तीन वर्षांत बिबट्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून किती वाढ झाली हे आता २०२६ मध्ये गणनेनंतर समोर येईल, असे वन विभागातील अधिकाऱ्याने सांगितले.

## खारघर टेकडीवर बिबट्याचा वावर... ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण, सुरक्षेसाठी ठोस उपाययोजनांची मागणी

■**नवी मुंबई। प्रतिनिधी,**

खारघर टेकडीवरील चाफेवाडी पाडा परिसरात बिबट्या दिसल्याने स्थानिक ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. वनविभागाने तातडीने गस्त वाढवून बिबट्याला बंदिस्त करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात आली आहे. खारघर डोंगरावर मागील काही वर्षांत वनविभागाकडून मोठ्या प्रमाणात रोपलागवड करण्यात आली आहे. बांधकामाचा आवाज, नैसर्गिक अधिवास घटल्याने बिबट्या, कोल्हा यांसारखे वन्यजीव टेकडीच्या जंगलात आश्रय घेत असल्याची चर्चा परिसरात आहे. सुमारे चार महिन्यांपूर्वी चाफेवाडीकडून फणसवाडीकडे जाणारा रस्ता ओलांडताना बिबट्या दिसल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली होती. यानंतर पाणथळ जागी सीसीटीव्ही बसवणे व पावलांचे ठसे शोधण्याची मोहीम राबविण्यात आली; मात्र काहीही हाती लागले नव्हते. १८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता चाफेवाडी पाडा लगत पुन्हा बिबट्या दिसल्याचा दावा ग्रामस्थांनी केला. त्यामुळे चाफेवाडी व फणसवाडी परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



## मुंबई भाजप अध्यक्षांनी पोलिसांची लाज काढली, आई-बहिणीवरून शिवीगाळ, व्हिडीओ व्हायरल... ठाकरे गटाचा गंभीर आरोप



■**ठाणे। प्रतिनिधी,**

राज्यातील २४६ नगरपालिका आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकीसाठी येत्या २ डिसेंबरला मतदान होणार आहे, तर ३ डिसेंबरला लगेचच मतमोजणी होऊन निकाल जाहीर होणार आहे. राज्यात निवडणुकांचा धुराळा पाहायला मिळत आहे. यानंतर आता सध्या मुंबई महापालिका निवडणुकांचे रणशिंग फुंकले जाणार आहे. सध्या महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना ठाकरे गट चांगलाच आक्रमक झाला आहे. त्यातच आता शिवसेना ठाकरे गटाचे नेते अखिल चित्रे यांनी भारतीय जनता पक्षाचे मुंबई अध्यक्ष आमदार अमित साटम यांच्यावर अत्यंत गंभीर आरोप केले आहेत. अमित साटम हे त्यांच्या पदावर राहण्याच्या योग्यतेचे नाही, असा आरोप अखिल चित्रे यांनी केला आहे.

अखिल चित्रे यांनी नुकतंच त्यांच्या अधिकृत ट्वीटरवर एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी अमित साटम यांचा एक व्हिडीओ पोस्ट केला आहे. या व्हिडीओत अमित साटम हे मुंबई पोलिसांची लाज काढताना, त्यांना शिवीगाळ करताना दिसत आहेत. तसेच यावेळी अमित साटम हे गरीब उत्तर भारतीयांना जीवानिशी मारण्याची धमकी देतानाही दिसत आहे. यावरुन अखिल चित्रे यांनी अमित साटम यांच्यासारख्या व्यक्तीला मुंबई अध्यक्षपदी ठेवणे कितपत योग्य आहे, असा सवाल केला आहे.

**अखिल चित्रे काय म्हणाले ?**

मुंबई पोलिसांची लाज काढली जात असेल, गरीब उत्तर भारतीयांना जीवानिशी मारण्याची धमकी दिली जात असेल आणि ‘नमस्ते सदा वत्सले मातृभूमी’ म्हणणाऱ्यांकडून आई-बहिणींवरून अर्वाच्य, अश्लाघ्य शिव्या ऐकाव्या लागणार असतील... तर अशा अमानुष, शिवराळ अमित साटम इसमाला मुंबई भाजपा अध्यक्षपदी ठेवणं कितपत योग्य ? ‘देवा’ आता तूच भाजपाला सुबुद्धी दे... नाहीतर मराठी संस्कारात वाढलेले मुंबईकरच भाजपाला काही दिवसात वठणीवर आणतील!, असे अखिल चित्रे यांनी म्हटले आहे.

दरम्यान अमित साटम हे पूर्वीपासूनच वादग्रस्त वक्तव्ये आणि कथित गैरवर्तनामुळे चर्चेत राहिले आहेत. २०१७-१८ दरम्यान साटम यांच्यावर बीएमसी कर्मचाऱ्यांशी गैरवर्तन केल्याचे आणि धमक्या दिल्याचा आरोप होता. बीएमसी कर्मचाऱ्याला अपशब्द वापरल्याची कथित ऑडिओ क्लिप देखील व्हायरल झाली होती. तसेच २०१७ मध्ये त्यांच्यावर फेरीवाल्यांना मारहाण आणि पोलिसांशी गैरवर्तन केल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. याप्रकरणी त्यांच्यावर गुन्हाही दाखल झाला होता. आता या नवीन व्हिडीओमुळे मुंबई भाजपसाठी हा एक मोठा पेच निर्माण होण्याची शक्यता आहे.

अखिल चित्रे यांच्या या गंभीर आरोपांवर भाजप प्रदेशाध्यक्ष किंवा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तसेच अमित साटम यावर काय प्रतिक्रिया देतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.



## संपादकीय...


संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# व्यवस्थेतील विरोधाभास



लोकशाही असलेल्या भारतात प्रतिदिन एकापेक्षा एक आश्चर्य वाटाव्यात, अशा विरोधाभासी घटना घडत असतात. त्यांतीलच २ घटना झ पहिली, कर्नाटकात दारूचे दुकान उभे करण्यासाठी मंदिर पाडण्यात आले आणि दुसरी म्हणजे हिमाचल प्रदेशात. तेथे १ वर्षाहून अधिक कालावधीपासून अनधिकृत मशीद पाडली जावी, यासाठी आंदोलने होत आहेत. बेंगळुरूतील होसकोटे तालुक्याच्या नंदगुडी गावात दारूचे दुकान बांधण्यात अडथळा ठरत असल्यामुळे मध्यरात्री जेसीबी आणून समाजकंटकांनी श्री आंजनेय स्वामींचे मंदिरच पाडले, तर सिमला येथील संजौली परिसरातील अनधिकृत मशिदीला टाळे ठोकण्याच्या मागणीसाठी 'देवभूमी संघर्ष समिती'ने २१ नोव्हेंबर या दिवशी पुन्हा एकदा आंदोलन करण्याचे ठरवले आहे. समाजाला सात्त्विकता देर्णाया मंदिरापेक्षा त्याला दारू उपलब्ध करून देऊन व्यसनाधीन बनवणे आणि आंदोलनानेच काय, तर न्यायालयाच्या आदेशानंतरही साधी वीटही हलणार नाही, या उद्दाम वृत्तीने गुन्हेगारांना आश्रय देणारी मशीद उभी असणे, या दोन्ही घटनांना कारणीभूत कोण आहे? या प्रश्नाचे उत्तर 'व्यवस्था' हे आहे. कर्नाटक आणि हिमाचल प्रदेश या दोन्ही राज्यांत सत्ता काँग्रेसचीच! काँग्रेस आणि अव्यवस्था हे समीकरणच! त्यामुळे ते बाजूलाच ठेवूया. 'दोन्ही घटनांकडे मंदिर आणि मशीद यांचा उल्लेख असल्याने धर्माच्या चष्म्यातून याकडे पाहिले जाते', असे म्हणर्णायांनी त्यांकडे 'वास्तू' म्हणून पहावे आणि दोन्ही घटनांचे पुनरावलोकन करावे. दारूचे दुकान उभे करण्यासाठी कुणाचीही कुठलीही वास्तू परस्पर, सरकारी अथवा प्रशासकीय अनुमतीविना पाडणे व्यवस्थेच्या दृष्टीने योग्य आहे का ? आणि न्यायालयाने आदेश देऊनही आणि वर्षभर आंदोलने होऊनही एखादी अनधिकृत इमारत अद्याप पाडली जात नाही, हे व्यवस्थेच्या दृष्टीने योग्य आहे का ? दोन्ही प्रश्नांचे उत्तर 'नाही' हेच आहे. 'अयोग्य आहे, तरी ते आहे', हाच व्यवस्थेतील विरोधाभास आहे. देशातील अनेक खेड्यापाड्यांतील प्राथमिक आरोग्य केंद्रांत, जिल्हा रुग्णालयांत डॉक्टर नाहीत; दुसरीकडे डॉक्टर झालेले मुसलमान जिहादी आतंकवादी असल्याचे पुढे येत आहे. अनेक शाळांमध्ये शिकवायला शिक्षक नाहीत, तर दुसरीकडे देशात बेरोजगार युवकांचे प्रमाण अधिक आहे. खासगी उद्योगक्षेत्रात मरेपर्यंत काम करण्याची पद्धत रूढ आहे, तर सरकारी कार्यालयातील कामांना निवांतपणाची बुरशी लागली आहे. काळानुसार लोक शिक्षित झाले; पण सुविचारी आणि सुसंस्कृत झाले नाहीत. देश सुरळीत चालू रहावा, यासाठी भारतात वेगवेगळ्या प्रकारच्या प्रशासकीय व्यवस्था कार्यरत आहेत; पण कुठल्याही व्यवस्थेत व्यवस्था राखण्यासाठी ना उद्देश आहे, ना व्यवस्थापन, ना कार्यवाही, ना नियंत्रण! 'एखादे काम योग्य प्रकारे वा पूर्ण होण्यासाठी केलेल्या आणखीला व्यवस्था म्हणतात', ही व्याख्या आताच्या काळानुसार 'एखादे काम न करण्यासाठी कोणतेही मार्ग अवलंबून ती केल्यासारखी दाखवणे', अशी झाली आहे. स्वातंत्र्याच्या ७८ वर्षांनंतरही ढासळलेल्या व्यवस्थेची अनेक वृत्ते वृत्तपत्रांतून आणि आता सामाजिक माध्यमांतून झळकत आहेत. कुठे अनधिकृत फलक लागतात, कुठे अवैधपणे वाळूचा उपसा होतो, कुठे सरकारी भूमीवर अतिक्रमण होते, कुठे अनैतिक कृत्ये होतात. असे अपप्रकार देशभरात सर्वच ठिकाणी तेही मोठ्या प्रमाणात पहायला मिळतात. अनधिकृत फलक, अवैध परवाना, कायद्याचे उल्लंघन, गुन्हेगारी, घोटाळे, घुसखोरी अशा बातम्यांनी वृत्तपत्रांची पाने सदैव भरलेली असणे, हे व्यवस्था खालावल्याचे किंवा ती नसल्याचे दर्शक आहे. व्यवस्थेच्या आरंभी 'अ' लागला की, तीही 'अव्यवस्था'च होते आणि तीच टाळण्यासाठी व्यवस्थेने व्यवस्थितपणे कार्य करणे आवश्यक आहे. आतंकवादालाही कारणीभूत व्यवस्थाच आहे, हे म्हणण्याला वाव आहे. देहलीतील लाल किल्ल्याजवळ आतंकवाद्यांनी केलेल्या बाँबस्फोटाचे धागेदोरे अल-फलाह विद्यापिठात आढळले. वर्ष २०१४ पासून म्हणजे गेली १० वर्षे हे वैद्यकीय विद्यापीठ चालू आहे. तेथील अनेक डॉक्टर आतंकवादी आक्रमणाची चौकशी चालू झाल्यावर पसार झाले. या विद्यापिठाच्या प्रमुखाने कोट्यवधी रुपयांची मालमत्ता अवैधरित्या जमवली. तेथे जिहादी डॉक्टर हळूहळू आतंकवादाचे विष पसरवत होते आणि ते जिहादी केंद्र बनले होते, याचा मागमूस प्रशासनाच्या कोणत्याही व्यवस्थेला लागू नये, हे व्यवस्थेचे सर्वांत मोठे अपयश आहे. मुंबईतील २६/११ च्या आक्रमणाच्या वेळीही समुद्रकिनाऱ्यावर कार्यरत व्यवस्थेतील ढिसाळपणामुळेच आतंकवादी अगदी सहजगत्या मुंबईत घुसले आणि मोठी जीवितहानी करू शकले. गुजरातमधील सोमनाथ मंदिराच्या परिसरातील मोठ्या भूमीवर मुसलमानांनी मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केले, ते काही वर्षे तसेच होते. सरकारच्या अथवा मंदिरांच्या अनेक सरकारी भूमींवर मुसलमान अतिक्रमणे करून मशिदी, घरे बांधतात. घरे किंवा मशिदी उभ्या राहीपर्यंत ते न कळण्याला त्यांचा आकार काही काडेपेटीसारखा नसतो. ते लक्षात येऊ शकते; पण त्याकडे कुठलीही व्यवस्था तितकेसे लक्ष देत नाही. त्यासाठी व्यवस्थेतील प्रत्येक टप्प्यावर 'मलई' लाटली जाते. जोपर्यंत एखाद्या अपप्रकाराचे स्वरूप वाढून ते 'समस्या' म्हणून पुढे येत नाही, तोपर्यंत ढिसाळपणा चालू असतो. मग कुणीतरी त्याविरुद्ध तक्रार करतो. आणखी २-४ तक्रारी आल्यानंतर आणि कुणी आंदोलन वगैरे केल्यानंतर कारवाईसाठी 'अतिरिक्त' श्रम घेतले जातात. अतिक्रमण कशा प्रकारे होते? हे प्रशासनालाही ठाऊक आहे, तरीही याकडे मोठ्या प्रमाणात झालेले दुर्लक्ष व्यवस्थेच्या गळ्याशी केव्हाच पोचले आहे. भारताची आजची परिस्थिती सांगते की, समस्या ही केवळ एखाद्या मंदिराची किंवा अतिक्रमणाची नाही; समस्या ही प्रत्येक स्तरावर कुंथलेल्या व्यवस्थेची आहे. 'करावे एक आणि दाखवावे दुसरे' ही आजच्या व्यवस्थेची ओळख बनली आहे. शिक्षण, आरोग्य, कायदा-सुव्यवस्था, प्रशासन, विकास अशा प्रत्येक क्षेत्रात हा विरोधाभास जाणवतो. अतिक्रमण, गुन्हेगारी, भ्रष्टाचार, अकार्यक्षमता आणि ढिसाळपणा यांची साखळी पुष्कळ बळकट झाली आहे. प्रतिदिन नवी आश्चर्ये देणारी व्यवस्था देशाचा प्रवास अधोगती होण्याला पुरेशी आहे. कायदे आहेत, आदेश आहेत, नियम आहेत; पण त्यांची कार्यवाही करणारी यंत्रणा जर निष्प्रभ असेल, तर समाजात अन्याय आणि विरोधाभास होणारच. त्यामुळेच प्रशासनाने, राजकीय नेतृत्वाने आणि समाजाने आपापले उत्तरदायित्व ओळखणे आवश्यक आहे. देश चालवणारी व्यवस्था दायित्व विसरली की, गुन्हेगारांचे धैर्य वाढते, तर सर्वसामान्यांचा विश्वास ढासळतो. म्हणूनच आवश्यकता आहे ती व्यवस्थेच्या मूळ ढाच्याला सक्षम करण्याची. 'अव्यवस्थे'तील या शब्दातील 'अ' काढून टाकण्यासाठी राष्ट्रहितासाठी कठोर, निष्पक्ष आणि सतत कार्यरत रहाणारी व्यवस्था उभी करणे आवश्यक आहे. राष्ट्रहितासाठी जागरूक व्यवस्था उभी राहिली, तरच हा विरोधाभास संपेल आणि भारतात सुराज्य येऊ शकेल!

# सिनेमा, वेबसीरिजचे समाज मनावर होणारे घातक परिणाम



मुंबईने काही दिवसांपूर्वी एक सिनेमास्टाईल थरार अनुभवला. रोहित आर्य नावाच्या एका व्यक्तीने तब्बल १७ मुलांना ओलिस ठेवत आपल्या मागण्या सरकारपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला. पण, ही घटना समोर येताच तुमच्या डोक्यात एका सिनेमाचे नाव हमखास आले असेल ते म्हणजे काही वर्षांपूर्वीच डिस्नी प्लस हॉटस्टारवर आलेला प्रसिद्ध अभिनेत्री यामी गौतमचा अ थर्सडे. खऱ्या आयुष्यातील घटना सिनेमाच्या एका गोष्टीप्रमाणे वाटावी अशी ही पहिलीच वेळ नव्हे. जेव्हापासून सिनेमा हा लोकांच्या मनोरंजनापेक्षा सुड उगवण्याची प्रेरणा बनला आहे, तेव्हापासून अशा वृत्तीला आळा घालणं कठीण झालं आहे. काही सिनेमे आणि मालिका गुन्ह्यांना प्रवृत्त करतात.

सिनेमा हा समाजाचे प्रतिबिंब असल्याचे आपण आधीपासून ऐकत आलो आहोत. अशामध्ये अनेकदा सिनेमातील अनेक घटना या खऱ्या आयुष्यातील घटनेशी संबंधित किंवा प्रेरित असतात. गेल्या काही दशकांपासून अनेक अशा घटना समोर आल्या आहेत, ज्यामध्ये सत्य घटनेवर आधारित एक गोष्ट आपल्याला मोठ्या पडद्यावर दाखवली जाते. अर्थात, काहीतरी चांगले सकारात्मक विचार किंवा फारफार तर मनोरंजन करण्याचे काम या सिनेमांद्वारे केले जाते. पण, समाजावर पडणारा सिनेमाचा प्रभाव हा गेल्या अनेक दशकांपासून चिंतेचा विषय ठरला आहे. काही सिनेमा किंवा मालिका, या गुन्हेगारीला प्रवृत्त किंवा युक्ती देणाऱ्या ठरल्या आहेत. यामुळे लोकांची मानसिकता आणि काही सिनेमांचा पडणारा प्रभाव हा चर्चेचा विषय ठरला आहे. २०२३ या वर्षात 'द क्रिमिनोलॉजी परस्पेक्टिव्ह ऑफ क्राइम फिल्म्स' या अभ्यासात अभ्यासकांनी म्हटले होते की, त्यांनी केलेल्या सर्वेमध्ये ७० टक्के लोकांनी सिनेमा हा गुन्ह्यांना प्रेरित करतो असा दावा केला होता.

सिनेमांमध्ये दाखवल्या गेलेल्या गोष्टींचे अनुकरण करताना, अनेकदा काही गुन्हे घडल्याचे आपल्या ऐकिवात किंवा नजरेत आलेच असेल. याचे एक ताजे उदाहरण म्हणजे नुकतेच मुंबईतील रोहित आर्य प्रकरण. मुंबईतील गजबजलेल्या पवईसारख्या शहरात एक व्यक्ती आपल्या मागण्या पूर्ण करून घेण्यासाठी १७ लहान मुलांना ओलिस ठेवतो. त्या मुलांना आपल्यासोबत काय होत आहे? याची साधी कल्पनाही नसते. पण, त्यांच्या खाद्यांवर बंदूक ठेवून तो प्रशासनाला आपल्या मागण्या पूर्ण करण्यासाठी धमकावत असतो. ही एक गोष्ट ऐकल्यानंतर एखाद्या सिनेमाची गोष्ट असल्यासारखे वाटल्यावाचून राहत नाही. अशीच एक तंतोतंत योजना एका सिनेमात दाखवली आहे. एका घडलेल्या घटनेवरच तो सिनेमा बनवला असावा पण, असे नव्हे. अशीच एक घटना दाखवणारा सिनेमा, यामी गौतमची प्रमुख भूमिका असलेला, अ थर्सडे हा २०२२ या वर्षात ओटीटीवर प्रदर्शित झाला होता. पण आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे, रोहित आर्य प्रकरण हे २०२५ च्या ३१ ऑक्टोबर रोजी घडले.

उद्देश वेगळे असले तरी योजना सारखीच, आराखडाही जेमतेम सारखाच. यामी गौतमचे पात्रही शिक्षिकाच, रोहित आर्यही तसं बघायला गेले तर शिक्षकच होता, जो त्या उपस्थित मुलांना त्याच्या आगामी वेब सीरिजसारखे प्रशिक्षण देत असल्याचे त्या मुलांना भासवत होता. अशामध्ये यामी गौतमच्या पात्राप्रमाणेच त्याने मुलांच्या नावाने प्रशासनाला धमक्या देऊन आपल्या मागण्या पुढे ठेवू पाहिल्या. पण, तो तेव्हा हे विसरला की, सिनेमा आणि खऱ्या आयुष्यात मोठा फरक असतो. एकीकडे सिनेमात यामी गौतमच्या पात्राला न्याय मिळतो. पण दुसरीकडे खऱ्या आयुष्यात रोहित आर्यचा एन्काऊंटरमध्ये मृत्यू होतो. त्यानंतर असे म्हटले गेले की, रोहित आर्यने ही सर्व योजना सिनेमापासून आखल्याची चर्चा सुरू झाली. पण, यामध्ये किती तथ्य हे सांगता येणे कठीण. पण, यावेळी सध्याच्या घडीला पहिल्यांदाच लोकांना विचार करण्यास भाग पाडले की, होऊन गेलेला सिनेमा आणि घडलेली घटना यामध्ये एवढे साधर्म्य कसे? पण, सिनेमात घडलेल्या त्या घटनेचा विद्यार्थ्यांवर आणि पालकांवर नंतर काय परिणाम होतो? याची मात्र जाणीव खऱ्या आयुष्यात विचार केल्यावर भयावह चित्र समोर येते.

२०२२ मध्ये एका प्रकरणाने संपूर्ण देश हादरला होता. महाराष्ट्रातील पालघरमध्ये राहणारी श्रद्धा वालकर ही आपल्या लिव्ह-इन पार्टनरसोबत दिल्ली येथे राहत होती. ती बेपत्ता असल्याचे समोर आल्यानंतर वडिलांनी पोलिसांकडे तक्रार दिली आणि यातून जे समोर आले ती धक्कादायक होते. तपासातून समोर आले की, श्रद्धा वालकरची हत्या ही त्याचा प्रियकर आफताब अमीन पूनावालाने केली होती. यावेळी आफताबने तिची गळा दाबून हत्या केली. त्यानंतर तिची ओळख पटू नये म्हणून तिच्या शरीराचे तब्बल ३५ तुकडे केले. तिच्या शरीराचे ते तुकडे कुजून वास येऊ नये म्हणून त्याने फ्रीजमध्ये ठेवले. हा अपराध माणुसकीला लाजवेल असाच होता. पण, त्यानंतर त्याची चौकशी करताना हे कृत्य त्याने एका इंग्रजी वेब सीरिजने प्रेरित होऊन केल्याचे समोर आले.

सिनेमातील एखादा हिरो हा गुंडप्रवृत्तीचा, त्याची कामेही तशी कायद्याला धरून नसणारीच. पण, तरीही त्याला अशाप्रकारे सादर केले जाते की त्याची स्टाईल, त्याची चालण्याबोलण्याची वृत्ती रुबाबदार दर्शवली जाते. तो काही चुकीचे करत नसून त्याचे अनुकरण करायला हवे, अशी भावना तरुणांच्या मनात निर्माण होते. पुष्पा, केजीएफ हे त्याचे एक उत्तम उदाहरण आहे. पुष्पा हा सिनेमा प्रदर्शित झाला आणि त्याची स्टाईल आणि स्वॅग पाहून अनेकांनी तसे अनुकरण करत गुन्हा केल्याचे समोर आले. पुष्पा सिनेमा पाहून काही अल्पवयीन मुलांनी स्वतःला गँगस्टर म्हणवून घेण्यासाठी काही निष्पाप लोकांना जीवे मारले. तर, एकाने पुष्पा सिनेमात दाखवल्याप्रमाणे चंदनाची तस्करी करून पोलिसांना मूर्ख बनवण्याचा प्रयत्न केल्याचे समोर आले. एवढेच नव्हे तर, केजीएफ सिनेमा पाहून १९ वर्षीय शिवा प्रसादने स्वतःला प्रसिद्ध गँगस्टर बनविण्यासाठी तब्बल ५ लोकांचा जीव घेतला, ज्यामधील ४ सुरक्षा रक्षकांना झोपेतच मारले होते. यामुळे तो गँगस्टर तर नाहीच, पण सीरियल किलर बनला.

अनेक सिनेमांमध्ये प्रेमभंग आणि हिरोचा नकार न पचवणे, तसेच त्यासाठी वाट्टेल ते करणे हे ज्याप्रकारे दाखवले जाते. त्याचा समाजावर खासकरून मुलांवर कसा परिणाम होतो? याची तर अनेक उदाहरणे आहेत. सर्वांत प्रसिद्ध म्हणजे २०१९ मधील उत्तर प्रदेशात झालेली हत्या. अश्विनी कश्यप उर्फ जॉनी दादा नावाच्या एका व्यक्तीने दुबईतील फ्लाईट अटेंडंट नीतिका शर्मा नावाच्या मुलीची हत्या केली. तिच्यावर तो प्रेम करत होता. पण तिचे दुसऱ्याच सोबत लग्न होणार असल्याचे कळल्यानंतर कश्यपने तिची हत्या केली. गुन्ह्यानंतर त्याने शाहीद कपूरच्या कबीर सिंगमधील संवाद वापरत टिकटॉकवर एक व्हिडिओ पोस्ट केला. तसेच, दुसरीकडे २०१६ मध्ये स्नॅपडीलची आयटी इंजिनिअर दिप्ती सरना प्रकरणात आरोपीने १९९३ मध्ये आलेल्या शाहरुख खानच्या डर सिनेमातून प्रेरणा घेत अपहरण केले. अशी बरीच प्रकरणे देशाच्या कानाकोपऱ्यात पाहायला मिळतील, जिथे एकतर्फी प्रेमाचा उतारा काढण्यासाठी अनेकांनी सिनेमांच्या युक्त्यांचा सहारा घेतला आहे.

जेव्हापासून सिनेमा हा लोकांच्या मनोरंजनापेक्षा सूड उगवण्याची प्रेरणा बनला आहे, तेव्हापासून अशा वृत्तीला आळा घालणे खरंच कठीण झालं आहे. कारण, काही सिनेमे आणि मालिका अशा काही बनवल्या जातात ज्या अशा गुन्ह्यांना प्रवृत्त करण्याचे काम करतात. पूर्वी सिनेमा हा समाजाचा आरसा मानला जात होता. पण, सध्याच्या काळात सिनेमा हा फक्त पैसे कमावण्याचे साधन नसून काही जणांसाठी तो जीवनात थोड्या काळासाठी का होईना पण आनंद, मानसिक समाधान मिळवण्याचे एक सोपे साधन बनला आहे. यामध्ये सिनेमा बनवताना व्यावसयिक बाबी लक्षात घेता विचार आणि त्यातील कृतींचे परिणाम यावर सध्याच्या काळात खूप कमी लक्ष दिले जाते. अशामध्ये बहुतांश लोक हे सिनेमातील सकारात्मक गोष्टी आत्मसात करतात. तर काही नकारात्मक गोष्टी अंगी उतरून त्याचे अनुकरणही करतात. मग प्रश्न पडतो की, यावर उपाय काय? तर सिनेमा बघताना सर्व बाजू समजून काय चांगले, काय वाईट, कोणत्या कृतीचे परिणाम कसे होतील, यावर इतरांशी चर्चा करणे हा एक उपाय असू शकतो. मग ती आपली मुले असोत, पालक असोत, भावंडे असोत किंवा मित्रमंडळी. कारण, काळजी घेतली नाही तर पडद्यावरचे जग जेवढे रोमहर्षक वाटते, तेवढेच ते खऱ्या आयुष्यात एक भयानक चित्र बनून समोर येऊ शकते.

# पक्षांतर्गत संघर्ष आणि अस्वस्थ नेते

**भाजपबरोबर दोन हात करत असतानाच, पक्षांतर्गत संघर्ष तीव्र झाला आहे. सध्याच्या घडीला एकनाथ शिंदे यांची शिवसेना अस्वस्थ झाली आहे. त्यामुळे हा सत्तासंघर्ष आगामी काळात कसे वळण घेतो हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.**

ज्या शिलेदारांना सोबत घेत एकनाथ शिंदे यांनी ठाकरेंच्या शिवसेनेला जय महाराष्ट्र करत जबर धक्का दिला, तेच शिलेदार आता एकनाथ शिंदे यांच्यासाठी घातक ठरतायत की काय, अशी भीती राजकीय वतुर्ळात व्यक्त केली जात आहे. आधीच भाजपकडून एकनाथ शिंदे यांची कोंडी होत असतानाच आता विश्वासू शिलेदारच शिंदे यांच्या विरोधात बंड पुकारणार, अशी राजकीयदृष्ट्या अगदी नाजूक परिस्थिती शिवसेनेत निर्माण झाली आहे. भाजपबरोबर दोन हात करत असतानाच, त्यात पक्षांतर्गत संघर्ष वाढीस लागल्यामुळे सध्याच्या घडीला एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत अस्वस्थता निर्माण झाली आहे.

जून २०२२ मध्ये एकनाथ शिंदे यांनी शिवसेना बाळासाहेब उद्धव ठाकरे यांच्या पक्षाला जय महाराष्ट्र केला आणि भाजपशी जवळीक साधली. ठाकरेंच्या शिवसेनेला जय महाराष्ट्र करणे, भाजपशी हातमिळवणी करणे यामागे अनेक कारणे सांगितली जात आहेत. शिंदे यांनी उद्धव ठाकरेंना जबर धक्का दिला आणि देशातील राजकारणात शक्तिशाली भूकंप झाला. या भूकंपाचा केंद्रबिंदू अर्थातच महाराष्ट्र होता.

एकनाथ शिंदे यांचा सूरत-गुवाहाटी-गोवा असा राजकीय प्रवास सुरू झाला. या राजकीय प्रवासात उदय सामंत, दीपक केसरकर, शहाजी बापू, संजय शिरसाट, प्रताप सरनाईक असे दिग्गज नेते शिंदेंच्या सोबतीला होते. ठाकरेंच्या ४० नेत्यांना बरोबर घेत एकनाथ शिंदे यांनी नव्या राजकीय इनिंगला सुरुवात केली. स्वतःची शिवसेना स्थापन केली, पक्ष-चिन्ह या दोन्ही गोष्टी निवडणूक आयोगाने शिंदे सेनेला बहाल केले. संघर्ष करत एकनाथ शिंदे यांनी आपल्या सहकाऱ्यांना सोबत घेत भाजपच्या मदतीने राज्यात सत्तापालट केला आणि मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांनी राज्याची सूत्रे हाती घेतली. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले हे त्यावेळचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पचनी पडले नसावे. त्यामुळे आडमार्गाने एकनाथ शिंदे यांची राजकीय कोंडी करण्याचा प्रयत्न झाला असावा. त्यातूनच एकनाथ शिंदे विरुद्ध फडणवीस असा वाद हळुवार समोर येऊ लागला. दुसरीकडे मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्याने शिंदेंच्या शिलेदारांनी खदखद व्यक्त करण्यास सुरुवात केली. एकीकडे भाजपकडून नाक दाबण्याचा प्रयत्न तर दुसरीकडे आपल्याच शिलेदारांची वाढती नाराजी, यामुळे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत अंतर्गत संघर्ष वाढत असून भविष्यात हा संघर्ष पेटणार अशी चिन्हे दिसू लागली आहेत. महायुती सरकारच्या स्थापनेनंतर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना सत्तेचा गोडवा अनुभवत असली, तरी पक्षांतर्गत नाराजी आणि विरोधाची धार तीव्र होत चालली आहे.

एकनाथ शिंदे यांनी शिवसेना फोडून सत्ता हस्तगत केली, तेव्हा त्यांच्याकडे मोठ्या संख्येने आमदारांचा पाठिंबा होता. परंतु सत्ता टिकवण्यासाठी केलेल्या भाजपवरील अवलंबित्वामुळे शिवसेना शिंदे गटाची स्वतंत्र ओळख धूसर होत चालली का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. खरी शिवसेना म्हणून आपण समोर आलो, पण प्रत्यक्षात भाजपच्या धोरणांना अनुसरून चालण्याशिवाय आता शिंदे सेनेकडे पर्याय राहिलेला नाही. त्यामुळे शिवसेनेची मूळ शैली, लढाऊपणा आणि स्वबळावर राजकारण करण्याची प्रतिमा कमकुवत होत चालली आहे. एकीकडे पक्ष चिन्ह यावरचा सर्वोच्च न्यायालयाचा निकाल, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबर शीतयुद्ध आणि पक्षातील नेत्यांची नाराजी यामुळे एकनाथ शिंदेंची चहुबाजूंनी नाकाबंदी झाली, असे राजकीय वतुर्ळात बोलले जात आहे.

मंत्रिपदे, संस्थांच्या नियुक्त्या, महत्त्वाच्या जबाबदाऱ्या यांमध्ये अनेक जणांना अपेक्षित स्थान न मिळाल्याने नाराजी वाढत आहे. त्यात स्थानिक पातळीवर भाजप आपली संघटना अधिक मजबूत करत आहे. अशा परिस्थितीत शिवसेना शिंदे गटातील आमदारांना स्वतःची जागा टिकवण्यासाठी भाजपकडे झुकावे लागत आहे. त्यात ठाकरेंच्या शिवसेनेशी सुरू असलेला संघर्ष, भाजपबरोबरील शीतयुद्धामुळे शिंदेंच्या शिवसेनेला सावध भूमिका घ्यावी लागत आहे. त्यामुळे एकनाथ शिंदे यांच्यासाठी सध्याचे आव्हान म्हणजे अंतर्गत विरोध शमवणे, कार्यकर्त्यांशी संवाद, संघटनात्मक सुधारणा आणि स्वतंत्र ओळख मजबूत करणे हे आगामी काळात त्यांच्या नेतृत्वाची खरी परीक्षा ठरणार आहे. कारण सत्ता मिळवणे जितके कठीण तितकेच ती टिकवण्यासाठी पक्षातील ऐक्य आवश्यक आहे आणि तेच आज शिंदे यांच्या शिवसेनेत सर्वाधिक डळमळीत झालेले दिसून येते.

महाराष्ट्रातील सत्तेचा राजकीय पट सतत बदलत असताना महायुतीतील तीन प्रमुख घटक – एकनाथ शिंदे यांची शिवसेना, भारतीय जनता पक्ष आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस – यांच्यातील नातेसंबंध दिवसेंदिवस गुंतागुंतीचे होत आहेत. एकत्रितपणे सत्ता उपभोगत असताना सार्वजनिकरीत्या उमटणारे वाद, टोला-टिप्पण्या आणि परस्परांवरील नाराजी, विशेषतः शिवसेनेत वाढत चाललेली अस्वस्थता, हे आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अत्यंत चिंताजनक आहे. भाजपच्या नेत्यांकडून झालेली प्रसंगी टीका, महत्त्वाच्या निर्णयांत शिवसेनेची मागे पडलेली भूमिका, तसेच मंत्रिमंडळात अपेक्षित तितकी प्रतिष्ठा न मिळाल्याच्या चर्चा, यामुळे शिवसेनेतील खासदार-आमदारांमध्ये अस्वस्थता वाढली आहे. "सत्तेत आहोत, पण निर्णय कुठे आपल्या हातात आहेत?" असा सूर आळवला जात आहे. महायुतीतल्या या अंतर्गत संघषार्ची सार्वजनिक झलक नुकत्याच झालेल्या सभांमध्येही दिसली, जिथे शिवसेना आणि भाजप नेत्यांत टोलेबाजी उफाळून आली. त्यात शिवसेनेचे अनेक नेते भाजपशी जवळीक साधून आहेत. त्यामुळे ठाकरेंच्या शिवसेनेला जय महाराष्ट्र करत स्वतःची शिवसेना स्थापन करणाऱ्या एकनाथ शिंदे यांना आता आपलेच शिलेदार नवी खेळी खेळतील आणि शिवसेना एकाकी पडेल, अशी भीती सतावणे स्वाभाविक आहे.

महायुतीतील तणाव लगेच वाढणार नाही, पण तो वाढत गेला तर आगामी निवडणुकीत त्याची मोठी राजकीय किंमत महायुतीला मोजावी लागू शकते. सत्तेची एकजूट टिकवण्यासाठी परस्परांतील मतभेद सोडवणे, निर्णय प्रक्रियेत पारदर्शकता ठेवणे आणि सर्व घटक पक्षांना समान प्रतिष्ठा देणे आवश्यक ठरणार आहे. त्यात जानेवारी २०२६ मध्ये पक्ष व चिन्ह याचा निकाल सर्वोच्च न्यायालय देणार आहे. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल काय असेल हे गुलदस्त्यात असले तरी तुम्ही-आम्ही समजू शकतो. तरीही निकाल शिंदेंच्या शिवसेनेविरोधात गेला तर मात्र शिवसेनेला भाजपमध्ये विलीन होणे हाच पर्याय राहील. एकीकडे भाजपशी शीतयुद्ध, पक्षांतर्गत वादावादी आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाची टांगती तलवार यामुळे शिवसेना अस्वस्थ झाली आहे, हेही तितकेच खरे.

## भीतीतून मुक्ती

संध्याकाळी एक श्रीमंत पाहुणा आश्रमात आला. पाहुणा थोडा भ्यायलेला वाटत होता. त्याला गुरुदेवांना एकांतातच भेटायचे होते. त्याची समस्या त्याला कुणासमोर सांगायची नव्हती. साधकाने गुरुदेवांशी संपर्क साधला. साधक पाहुण्याला गुरुदेवांपाशी घेऊन गेला. चिंतन कक्षात गुरुदेव बसले होते. पाहुणा त्यांच्यासमोर बसला. गुरुदेवांनी मंद स्मित केलं. पाहुणा म्हणाला, 'मला माझी समस्या नीट मांडता येणार नाही तरी प्रयत्न करतो. समजून घ्या.' एक क्षण थांबून तो पुढे म्हणाला, 'मला अध्यात्माची आवड आहे आणि प्रसिद्धीची तर खूपच आवड आहे. मला संपत्ती जमवायला आणि ती वाढवायला आवडतं, तर कधी तरी दानधर्म करायलाही आवडतं. मला यातली एक गोष्ट आवडत असते तेव्हा दुसऱ्या गोष्टीविषयी माझ्या मनात तिरस्कार निर्माण होतो. म्हणजे मी प्रसिद्धीसाठी प्रयत्न करत असतो तेव्हा मला अध्यात्म अप्रिय असतं. आणि जेव्हा सत्संग करतो, तुमची प्रवचनं ऐकतो तेव्हा, मीच करत असलेल्या माझ्या प्रसिद्धीविषयी माझ्या मनात चीड निर्माण होते. मग माझाच मला राग येऊ लागतो. गुरुदेव, मला नेमकं काय आवडतं आणि का आवडतं, हे न कळल्याने मला आता कुठलीही कृती करताना भीती वाटते. आपण काही तरी आततायीपणा करून सर्वस्व हरवून बसू, अशी ही भीती वाटते. गुरुदेव, या भीतीपासून मला मुक्तता हवी आहे. असं आत्मविश्वास हरवून जगणं मला शक्य नाही. मला यातून बाहेर काढा. मला मार्ग दाखवा.' गुरुदेव मंद स्मित करत म्हणाले, 'खरं काय? हे जर ओळखायचं असेल तर आपल्याला आपल्या भीतीवर लक्ष ठेवलं पाहिजे.' पाहुणा हात जोडून म्हणाला, 'गुरुदेव, मला समजेल असं सांगा.' गुरुदेव म्हणाले, 'भीती वाटण्यामागे दोन शक्यता असू शकतात. एक, आपल्याजवळ जे काही आहे ते गमावण्याची भीती. आणि दुसरं, जे मिळविण्यासाठी आपण अपरंपार प्रयत्न करत आहोत ते बहुधा मिळणारच नाही याची भीती.

# मशरुम्सची भाजी



**साहित्य :** मशरुम - २०० ग्रॅम, कांदा - १ मध्यम आकाराचा, तिखट - १ चमचा, हळद - १/२ चमचा, मीठ - चवीनुसार, जिरे - १ छोटा चमचा, तेल - फोडणीसाठी, आले-लसूण पेस्ट - १ छोटा चमचा, थोडी कोथिंबीर.

**पाककृती :** कांदा, कोथिंबीर बारीक चिरून घ्या. मशरुम्स उभे पातळ कापून घ्या. फोडणीसाठी तेल गरम करून जिरे, आले-लसूण पेस्ट, कांदा घालून परतून घ्या. कांदा थोडा शिजल्यावर मशरुम्स घालून परतून घ्या. नंतर हळद आणि तिखट घाला. झाकण ठेवून २ मि. शिजू द्या. या वेळात मशरुम्सना पाणी सुटेल, मग मीठ व कोथिंबीर घालून, गॅस मध्यम आचेवर ठेवून हे पाणी आटेपर्यंत शिजू द्या.

# चेहऱ्यावरील तीळ हटवण्याचे आठ घरगुती उपाय

चेहऱ्यावरचा एखादा तीळ ब्यूटीमार्क असू शकतो. परंतु, चेहऱ्यावर अधिक तीळ असल्यास किंवा त्यांची जागा चुकीची असल्यास ते खटकतात. शरीरावरील तीळ काढून टाकण्यासाठी काही डर्मेटोलॉजिक ट्रीटमेंट आहेत, परंतु घरगुती उपायांनीदेखील तीळ हटवले जाऊ शकतात, हे तुम्हाला ठाऊक आहे का?



- कपभर अननसाचा रस आणि पाव कप सैंधव मीठ एकत्र करा. या मिश्रणाने स्क्रब केल्यास चेहऱ्यावरील तीळ कमी होण्यास मदत होईल.
- लसणाची पेस्ट रात्री झोपण्यापूर्वी तिळावर लावा. त्यावर बॅण्डेज लावा. सकाळी उठल्यावर त्वचा कोमट पाण्याने स्वच्छ धुवा. हा प्रयोग नियमित केल्यास तिळाचा त्रास कमी होण्यास मदत होईल.
- काही आल्याचे तुकडे ठेचून तिळाच्या जागी लावा. त्यावर कपडा बांधून झोपा. या उपायानेही तीळ कमी होण्यास मदत होते.
- व्हिटॅमिन सीची एक गोळी बारीक कुटा. रात्री ही पेस्ट तिळावर लावून, त्यावर बॅण्डेज लावून झोपा.
- व्हिनेगरचा वापर करूनदेखील तीळ हटवला जाऊ शकतो. सुरुवातीला चेहरा गरम पाण्याने धुवा. कापसाच्या बोळ्याने व्हिनेगर तिळावर लावा. १० मिनिटांनंतर चेहरा गरम पाण्याने स्वच्छ धुवावा.
- कोथिंबीरच्या काही पानांची पेस्ट करा. ही पेस्ट काही दिवस तुम्हांला नको असलेल्या तिळावर नियमित लावा.
- एरंडेल तेलाच्या मॉलिशमुळेदेखील तिळापासून सुटका मिळू शकते. हळूहळू तीळ कमी होण्यास सुरूवात होईल.
- मध आणि सूर्यफूलाच्या बीयांच्या तेलाचे मिश्रण करा. या मिश्रणाचा तीळावर पाच मिनिटं मसाज करा. यामुळे त्वचा तजेलदार होईल सोबतच तिळ कमी होण्यास मदत होईल.



# मधुमेह आणि फळे

**मधुमेह हा आजार असलेल्या व्यक्तींनी आहाराबाबत सजग राहणे आवश्यक असते. फळांचे सेवन करताना काळजी घेतली पाहिजे , अन्यथा या फळांच्या सेवनाने रक्तातील साखरेचे प्रमाण वाढू शकते. बऱ्याच जणांचा असा गैरसमज असतो की फळांमध्ये नैसर्गिक साखर असल्याने रक्तातील साखर वाढत नाही. फळे सेवन केलेली चालतात, असे मानून मधुमेहाचे रुग्ण फळांचे सेवन करतात. पण फळांमध्ये असलेली नैसर्गिक साखर हानीकारक ठरू शकते.**



**चेरी :** चेरीमध्ये खूप जास्त साखर असते, त्यामुळेच आईस्क्रीम आदी गोष्टी तयार करण्यासाठी चेरीचा वापर केला जातो. एका चेरीमध्ये सुमारे ८ ग्रॅम साखर असते, त्यामुळे चेरीचे सेवन करताना काळजी घेतली पाहिजे आणि विशिष्ट प्रमाणातच चेरीचे सेवन केले पाहिजे. चेरीच्या सेवनाने रक्तातील शर्करेची पातळी वाढू शकते.

**आंबा :** आंबा हा वर्षातून एकदाच मिळणाऱ्या फळांपैकी एक आहे आणि बहुतेकांना आंबा खूप आवडतो. परंतु त्यातही नैसर्गिक साखरेचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे मधुमेहाच्या रुग्णांनी आंब्याचे सेवन करणे शक्यतो टाळले पाहिजे. सर्वसाधारणपणे एका आंब्यामध्ये ४५ ग्रॅम इतकी नैसर्गिक साखर असते.

**द्राक्षे :** रक्तातील साखरेची पातळी योग्य राखायची असेल, तर द्राक्षांचे सेवन करणे टाळावे. कारण द्राक्षही गोड असतात. एक कप द्राक्षांतून शरीरात २३ ग्रॅम साखर जाऊ शकते.

**लिची :** हे फळही जास्त साखरेचे प्रमाण असलेल्या फळांपैकी एक आहे. त्यामुळे रक्तातील साखर वाढू शकते. एक कप लिची फळांमध्ये २९ ग्रॅम एवढी नैसर्गिक साखर असते.

**डाळिंब :** डाळिंब रक्तातील ऑक्सिजनचे प्रमाण वाढवते, परंतु त्यातही साखरेचे प्रमाण अधिक असल्याने त्याचे सेवन केल्यास मधुमेही रुग्णांमध्ये रक्तातील साखरेचे प्रमाण वाढू शकते. एका साधारण आकाराच्या डाळिंबामध्ये ३९ ग्रॅमपर्यंत साखर असते. मधुमेही रुग्णांनी डाळिंबाचे सेवन टाळले पाहिजे.

मधुमेही रुग्णांनी वरील फळे टाळावी तसेच कोणतेही इतर फळ सेवन करताना विशिष्ट प्रमाणातच सेवन करावे, जेणेकरून रक्तशर्करेचे प्रमाण योग्य राहील. मधुमेही रुग्णांना रक्तातील साखर कमी होऊ द्यायची नसते, तशीच ती वाढूनही उपयोग नाही, त्यामुळे ठरावीक वेळेला आहार सेवन करतानाही तो योग्य प्रमाणात सेवन केला पाहिजे.

# व्यायामानंतर खाज येत असल्यास...

**खाज** येण्याच्या समस्येला प्रुराईटस देखील म्हटले जाते. व्यायामादरम्यान खाज आल्याने त्वचेच्या पेशींना त्रास होतो किंवा इरिटेशन होते. सर्वसाधारणपणे अचानक तापमानात झालेले बदल, संसर्ग किंवा सौंदर्यप्रसाधनांची प्रतिक्रिया यामुळे हे होते. काही व्यक्तींमध्ये प्रतिकारशक्ती कमजोर असल्यास ही लक्षणे दिसतात. अशाच प्रकारे जेव्हा आपण वेगात चालतो तेव्हा किंवा थंड जागेवरून गरम जागी जातो आणि थोडे श्रम करतो, तेव्हा खाज येऊ शकते. शरीरातील नसांमध्ये प्रुरिसेप्टर्स असतात. जेव्हा वातावरणात अचानक बदल होतो किंवा त्वचेवर कोणतीही रासायनिक प्रतिक्रिया दिसते, तेव्हा हे प्रुरिसेप्टर्स कार्यान्वित होतात आणि मेंदू आणि मणका यांना संकेत पाठवतात. त्या संकेतांऐवजी मेंदू शरीरात अशा प्रकारच्या रसायनांची निर्मिती सुरू करतो जी या शारीरिक अवस्थेशी निपटण्यासाठी आवश्यक असते. शरीराची ही प्रतिक्रिया समजण्यासाठीच खाज येण्याची समस्या सुरू होते. शरीरांतर्गत रसायनांमुळेही पित्ताची समस्या निर्माण होते.

**खाज कशी दूर करावी ?**

- व्यायामादरम्यान किंवा वेगाने चालताना किंवा अतिश्रम केल्यास शरीराला खाज येत असल्यास व्यायाम आणि श्रमाचे काम ताबडतोब थांबवा. एखाद्या उष्ण जागी असाल तर थंड जागी जाऊन थांबा. अशा परिस्थितीत हिवाळ्यापासून बचाव करण्यासाठी उबदार कपडे घातले असतील तर तेही काढून टाका आणि शरीराचे तापमान सर्वसामान्य कसे करता येईल यासाठी प्रयत्न करा. सतत खाज येत असेल तर वैद्यकीय सल्ला अवश्य घ्यावा.
- थंडीमुळे होणाऱ्या पित्ताने वैतागला असाल तर थंड पाण्याचा शेक घ्या. त्यामुळे रक्तवाहिन्या संकुचित होतात आणि हिस्टामिन या रसायनांचे अतिरिक्त वहन थांबवण्यास मदत करते. त्याचबरोबर पित्तामध्ये खाज येत असेल तर त्यावर उपाय म्हणून अर्धा कप दलिया पाण्याच्या टबात टाकून त्याने स्नान करावे.
- याखेरीज एका वाटीत २ चमचे बेकिंग सोडा घ्यावा आणि त्यात पुरेसे पाणी मिसळावे. ही पेस्ट करून खाज येणाऱ्या जागी लावावी तसेच जिथे पित्त उठले आहे त्यावरही लावावे.



# व्हॉट्सॲप स्टेट्समध्ये शेअर करा एचडी फोटो आणि व्हिडीओ! आलं नवीन फीचर

**व्हॉट्सॲपने एचडी फोटो आणि व्हिडीओ शेअरिंगचा अपडेट दिला आहे. आता व्हॉट्सॲप फोटो आणि व्हिडीओ स्टेट्समध्ये देखील क्वालिटी न बिघडवता शेअर करता येईल. हे फीचर अँड्रॉइड बीटा व्हर्जन २.२३.२६.३ मध्ये उपलब्ध आहे.**

व्हॉट्सॲपने अलीकडेच हाय डेफिनिशन म्हणजे एचडी क्वालिटीमध्ये फोटो आणि व्हिडीओ शेअरिंगचा अपडेट दिला होता. त्यानंतर आता व्हॉट्सॲप एक नवीन अपडेटमधून एचडी फोटो व्हिडीओ स्टेट्स अपडेट करण्याचा ऑप्शन देत आहे. म्हणजे तुम्ही एचडी फॉर्मेटमध्ये फोटो आणि व्हिडीओ आपल्या व्हॉट्सॲप स्टेट्सवर शेअर करू शकाल. सध्या स्टेट्समध्ये फोटो आणि व्हिडीओ शेअर केल्यावर त्याची क्वालिटी



खराब होते. परंतु आता व्हॉट्सॲप फोटो व्हिडीओ शेअर केल्यावर त्यांची क्वालिटी खराब होणार नाही.

**बीटा टेस्टरसाठी लाइव्ह झालं फीचर**

नवीन एचडी फोटो आणि व्हिडीओ शेअरिंग फीचर अँड्रॉइड बीटा व्हर्जन २.२३.२६.३ साठी सादर करण्यात आलं आहे. यात जेव्हा तुम्ही व्हॉट्सॲप स्टेट्स शेअर कराल, तेव्हा तुम्हाला एचडी आयकॉन दिसेल, ज्याच्या मदतीने एचडी फोटो आणि व्हिडीओ स्टेट्स शेअर करता येतील. व्हॉट्सॲपच्या एचडी स्टेट्सची सुविधा बीटा व्हर्जनमध्ये उपलब्ध आहे. सध्या याचा वापर बीटा टेस्टर करू शकतात. परंतु लवकरच हे फीचर सामान्य युजर्ससाठी उपलब्ध होईल, अशी अपेक्षा आहे.

**कसं वापरायचं एचडी फोटो-व्हिडीओ शेअरिंग फीचर**

- सर्वप्रथम तुम्हाला व्हॉट्सॲपचं बीटा व्हर्जन डाऊनलोड करावं लागेल. गुगल प्ले स्टोअरवरून व्हॉट्सॲपचं बीटा व्हर्जन डाऊनलोड करता येतं.
- यासाठी प्ले स्टोअरवर व्हॉट्सॲप पेज स्क्रोल डाऊन करा. त्यानंतर बीटा टेस्टर सेक्शनमध्ये जा.
- पुढे जॉईन ऑप्शनवर क्लिक करा.
- बीटा टेस्टरनंतर अपडेट आणि त्याची उपलब्धता चेक करा.
- त्यानंतर व्हॉट्सॲप अपडेट करून ओपन करा.
- अपडेट झाल्यावर नेहमीप्रमाणे तुमचे फोटोज किंवा व्हिडीओ स्टेट्सला शेअर करा आणि शेअर करताना 'एचडी' ऑप्शन निवडा.

**नोट - जर तुम्ही बीटा टेस्टर नसाल तर सध्या तुम्हाला एचडी फोटो आणि व्हिडीओ स्टेटस शेअरिंग ऑप्शनसाठी थोडी वाट पाहावी लागेल. जेव्हा हे फीचर लाइव्ह होईल, तेव्हा तुमच्या व्हॉट्सॲपमध्ये उपलब्ध होईल. यासाठी सिम्पल व्हॉट्सॲप अपडेट करावं लागेल, म्हणजे तेव्हा बीटा टेस्टर बनण्याची गरज नसेल.**

# शरीरात युरिक ॲसिडचे प्रमाण वाढले असेल तर या नॅचरल ड्रिंक्सने बॉडीला करा डिटॉक्स

योग्य खानपान आणि औषधांमुळे तुम्ही शरीरात तयार होणाऱ्या युरिक ॲसिडच्या स्तराला नियंत्रित करू शकता. युरिक ॲसिडची अधिकता शरीराला बऱ्याच प्रकारे नुकसान पोहोचवते. आम्ही तुम्हाला अशा काही नॅचरल ड्रिंक्सबद्दल सांगत आहोत ज्याचे सेवन केल्याने शरीरातील युरिक ॲसिडचे स्तर कमी होतील आणि तुम्हाला त्याचा योग्य फायदा देखील मिळेल.



**नारळपाणी**

युरिक ॲसिडच्या स्तराला नियंत्रित करण्याचा सर्वात उत्तम उपाय पाणी आहे. पाण्याशिवाय नारळपाणी देखील युरिक ॲसिडला नियंत्रित करतो. हे युरिक ॲसिडला पातळ करून किडनीला उत्तेजित करतात ज्यामुळे शरीरातून युरिक ॲसिड मूत्राच्या माध्यमाने बाहेर निघून जाते.

**मोसंबी आणि पुदिना**

या ड्रिंकमध्ये पर्याप्त मात्रेत व्हिटॅमिन असतात, जे युरिक ॲसिडच्या स्तराला कमी करण्यास मदत करतात. याचे सेवन करण्यासाठी मोसंबीचे साल काढून त्याच्या बारीक बारीक फोडी करून त्यात लिंबाचा रस आणि पुदिन्याचे पान घालावे व या मिश्रणाला मिक्सरमधून फिरवून त्याचा ज्यूस काढावा व त्याचे सेवन करावे.

**ब्लॅक चेरी आणि चेरी**

ब्लॅक चेरी आणि चेरीचा ज्यूस युरिक ॲसिडमुळे होणारे संधिवात किंवा किडनी स्टोनच्या समस्येसाठी योग्य आहे. ब्लॅक चेरी युरिक ॲसिडच्या सीरम स्तराला कमी करून संधिवात आणि किडनीहून क्रिस्टल दूर करण्यास मदत करते. यात अँटीऑक्सिडेंट आणि अँटी इंफ्लेमेंटरी गुणदेखील असतात, जे युरिक ॲसिडला कमी करण्यास मदत करतात.

**खिऱ्याचे सूप**

खिऱ्याचे सूप शरीराला हायड्रेड ठेवण्यासोबत युरिक ॲसिडच्या स्तराला कमी करतो. याचे सेवन करण्यासाठी एका भांड्यात खिऱ्याचा ज्यूस, पाव कप योगर्ट, पुदिन्याचे पान आणि लिंबाचा रस घालून मिक्सरमधून फिरवून घ्या आणि थोड्या वेळाने गार झाल्यावर त्याचे सेवन करा.

**सेबचा सिरका**

सेबचा सिरका शरीरातून युरिक ॲसिडला दूर करण्यास मदत करतो. अँटीऑक्सिडेंट आणि एंटीइंफ्लेमेंटरी गुणांमुळे हे शरीरात क्षारीय ॲसिड संतुलन बनवून ठेवतो. हा सिरका रक्ताच्या पीएच वॉल्यूमला वाढवून युरिक ॲसिडला कमी करण्यास मदत करतो.

**अननसाचा ज्यूस**

या ज्यूसमध्ये व्हिटॅमिन सी सोबत इतर अँटीऑक्सिडेंट असतात जे युरिक ॲसिडच्या स्तराला कमी करून शरीरातून बाहेर काढण्यात मदत करतात. याचे सेवन केल्याने शरीराला दुसरे इतर फायदेदेखील मिळतात.

# नाश्त्यामध्ये ब्रेड, कॉर्नफ्लेक्स खाणे शरीरासाठी हानीकारक

**सकाळच्या** नाश्त्यामध्ये अधिक जणांना ब्रेड, कॉर्नफ्लेक्स आणि अनेक तळलेले पदार्थ खाण्याची सवय असते. मात्र हे पदार्थ फुफ्फुसाच्या कॅन्सरला कारणीभूत ठरत असल्याचे नव्या संशोधनात समोर आलेय. व्हाईट ब्रेड, कॉर्नफ्लेक्स असे ग्लायसेमिक इंडेक्सयुक्त पदार्थ खाल्ल्याने फुफ्फुसाचा कॅन्सर वाढण्याची शक्यता असते. संशोधनादरम्यान ज्यांना हा आजार झाला होता अशा एक हजार ९०५ जणांना समाविष्ट केले होते. त्याचबरोबर दोन हजार ४१३ स्वस्थ व्यक्तींचेही निरीक्षण करण्यात आले. यादरम्यान त्यांच्या आहाराच्या सवयी जाणून घेतल्या. शोधकर्त्यांचे म्हणणे आहे की तंबाखू तसेच धूम्रपान न करणाऱ्या लोकांमध्येही फुफ्फुसाच्या कॅन्सरची लक्षणे आढळली. ज्यावरून त्यांच्या आहाराच्या सवयी या कॅन्सरसाठी कारणीभूत असल्याची शक्यता आहे.



# अनशापोटी करा गुळाचे सेवन

**अनशापोटी गूळ खाल्ल्यास ४ फायदे होतात. आपल्यापैकी बहुतेक लोक रात्री जेवल्यानंतर गूळ खातात. त्यामुळे जेवण पचण्यास मदत होते. अनशापोटी गूळ खाल्ल्यावर कोमट पाणी प्यायल्यास त्याचे आरोग्यासाठी अनेक फायदे असतात.**

**रक्तदाब नियंत्रणात राहातो :** रक्तदाब नियंत्रणासाठी गूळ प्रभावी ठरतो. गुळामध्ये भरपूर प्रमाणात कॅल्शिअम आणि फॉस्फरस आढळते. हे हाडांच्या मजबुतीसाठी आवश्यक आहेत. गुळाबरोबर आले सेवन केल्यास सांधेदुखीपासून मुक्ती मिळते.




**रक्त साफ होते :** सकाळी अनशापोटी गूळ खाऊन कोमट पाणी प्यायल्यास रक्त स्वच्छ होते. त्यामुळे नवीन रक्त तयार होते. हृदयरोग होण्याचा धोका दूर ठेवण्यासही गुळाच्या सेवनाचा फायदा होता.

**शरीराला मिळते ताकद :** गुळाच्या नियमित सेवनाने शरीर ताकदवान होते. दिवसभराचा थकवा दूर होण्यासही मदत होते. शरीरात ऊर्जा पातळी कायम राहाते आणि ती कमी होत नाही.

**पचनसंस्था मजबूत होते :** ज्या लोकांना आहार सहजपणे पचवण्यात अडचणी येतात त्यांनी गूळ आणि गरम पाणी सेवन करावे. या व्यक्तींसाठी ते औषधासारखे कामकरते. त्याचबरोबर बद्धकोष्ठता, पोटात वायू होणे, ॲसिडीटीसारख्या समस्यांपासून सुटका होण्यास मदत होते.

# 'या' चुका टाळल्या तर लग्नात वधूचा मेकअप होणार नाही खराब!



**घरात लग्नकार्य असलं की कामाची नुसती लगबग सुरू असते. धावपळ, धांदल असा सगळा माहोल असतो. मात्र अशा वातावरणातही एक आनंद, उत्साह असतो. लग्न म्हणजे दोन जिवांचंच नव्हे तर दोन कुटुंबांचं मीलन असतं. त्यामुळे हा दिवस घरातल्या प्रत्येकासाठी खास असतो. त्यातच वधू-वरांचा थाट तर काही औरच असतो. प्रत्येकाचं लक्ष या दोघांकडेच वेधलेलं असतं. लग्नात आलेल्या पाहूण्यांच्या नजरा, कॅमेरा हे जणू वधू-वरांकडेच केंद्रित झालेले असतात. त्यामुळे लग्नात सुंदर दिसण्यावर या दोघांचाही भर असतो. त्यातच वधू असेल तर विचारायलाच नको. अगदी साड्यांपासून मेकअपपर्यंत प्रत्येक गोष्ट खास असण्यावर तिचा भर असतो. मेकअपमुळे सौंदर्यात भर पडतेच. मात्र बऱ्याच वेळा उत्तम प्रतीच्या मेकअपचं सामान वापरूनही तो मेकअप नीट सेट होत नाही किंवा ऐनवेळी तो खराब दिसून लागतो. हे असं का होतं यामागे बरीच कारणं आहेत. यामध्ये आपल्या बदललेल्या जीवनशैलीचादेखील समावेश आहे.**

**हेअर कलर :** बदलत्या काळानुसार रोज नवनवी ट्रेंड बाजारात येत असतात. सध्या तरुणाईमध्ये हेअर कलर करण्याची क्रेझ दिसून येत आहे. त्यामुळे बऱ्याच तरुणी वेगवेगळ्या रंगांनी केस कलर करत असतात. पण काही वेळेस उत्सुक होऊन केलेला हेअर कलर त्यांचा चेहऱ्याला शोभून दिसत नाही. त्यामुळे लग्नासाठीचा लुक खराब होऊ शकतो. हेअर कलर व्यवस्थित सेटल होण्यासाठी १० ते १५ दिवस लागतात. त्यामुळे लग्नाच्या ४ ते ५ दिवस आधी हेअर कलर केल्यास जो लूक



आपल्याला अपेक्षित आहे तो मिळणार नाही. म्हणूनच लग्नापूर्वी जर केस कलर करायचे असतील तर निदान महिनाभर आधी कलर करावेत.

**हेअरकट :** हेअर कलरप्रमाणे हेअरकट देखील लग्नाच्या ४-५ दिवस आधी करू नये. कधी कधी हेअरकट आपल्याला हवा तसा होतं नाही किंवा तो ब्रायडल लूकला साजेसा नसतो. त्यामुळे लग्नात हेअरस्टाइल करताना अडचणी येऊ शकतात. त्यामुळे महिनाभर आधी हेअरकट केल्यास ते चांगले ठरते.

**लग्नापूर्वी सुंदर दिसण्यासाठी केलेले उपाय :** लग्नात सुंदर दिसावं ही प्रत्येक तरुणीची इच्छा असते. त्यामुळे बऱ्याच वेळा मुली फेशिअल, ब्लिच, क्लीनअप असे नानाविध प्रकार करतात. पण लग्नाच्या ४-५ दिवसआधी ब्यूटी ट्रीटमेंट करणं नुकसानदायक ठरत. कारण काही मुलींची स्कीन सेन्सिटीव्ह असते, काहींची ड्राय तर काहींची ऑइली असते. त्यामुळे अशा त्वचेसाठी वेगवेगळ्या ब्युटी ट्रीटमेंट असतात. मात्र काही वेळा योग्य प्रोडक्ट किंवा क्रीम न वापरल्यामुळे त्याचा परिणाम चेहऱ्यावर होऊ शकतो. चेहऱ्यावर लाल पूरळ किंवा पुटकुळ्या येऊ शकतात.

**अतिरिक्त व्यायाम :** लग्नात बारीक दिसावं याकडे मुलींचा जास्त कल असतो. त्यामुळे मुली बऱ्याचदा लग्नापूर्वी डाएट, व्यायाम करतात. तसंच लग्नाच्या १०-१२ दिवस आधी हार्ड वर्कआऊट करतात. परंतु यामुळे त्या थकतात आणि सोबतच चेहरा ही अगदी फिका पडतो.

**फास्ट फूड खाणे :** लग्नात मेकअपमुळे तर आपलं सौंदर्य वाढतंच मात्र त्याचप्रमाणे चेहऱ्यावर तजेला असणंही गरजेचं आहे. तजेला असेल तरच सौंदर्यात भर पडते. नितळ आणी सतेज चेहरा हवा असेल तर आपल्या आहाराकडे विशेष लक्ष देणं गरजेचं आहे. या काळात फास्ट फूड खाणं कमी करावं आणि पौष्टीक पदार्थ खाण्यावर भर द्यावा. फास्ट फूड खाल्यामुळे बऱ्याचदा चेहऱ्यावर पिंपल्स येण्याची शक्यता असते. त्यामुळे शक्यतो फास्ट फूड टाळावे.

# घसादुखीवर 'हे' झटपट घरगुती उपाय नक्की येतील कामी

**ऋतू** बदलले की शरीराच्या अनेक समस्या उद्भवतात. तसेच थंडीत अंगदुखी, पाठदुखीसोबत घसा खवखवणे, घसा दुखणे असे आजार देखील उद्भवतात. अशा वेळी आपल्याला कधी कधी गिळताना, बोलताना घशाला त्रास होतो. यालाच Throat inffection असेही म्हणतात. साधारणतः सर्दी, खोकला याप्रमाणे हा घशाला होणारा त्रास हे देखील व्हायरल इन्फेक्शन आहे. हे इन्फेक्शन काही दिवसांत आपोआप कमी होते. यामुळे याच्यावर काही इलाज करु नये असेही नाही. त्या समस्येकडे लक्ष न दिल्यास घशाला सूज येणे, टॉन्सिल्स लाल होणे, त्यावर पांढरे चट्टे येणे यांसारखे गंभीर आजार होऊ शकतात. अशा वेळी मग यावर त्वरित काय उपाय करता येईल अशा प्रश्न अनेकदा पडतो. म्हणूनच यावर झटपट घरगुती उपाय कोणते करता येईल ते पाहूया..



१. घशाला सूज उतरवण्यासाठी गरम पाणी पिण्याचे व हळद मिठाच्या पाण्याच्या गुळण्या करता येतील.

२. घसा दुखत असल्यास तोंडात आल्याचा तुकडा ठेवल्यास थोडा आराम मिळतो.

३. आलं, टोमॅटो आणि मधाचा रस एकत्र करून घेतल्याने घसादुखीपासून आराम मिळतो.

४. मध आणि कांदा टाकून उकळलेलं पाणी गाळून ते थोड्या-थोड्या वेळाने प्यावे.

५. पाण्यात बडीशेप टाकून ते पाणी उकळून घ्यावं आणि त्यानंतर त्यात मध टाकून हे पाणी थोड्या थोड्या वेळाने प्यावे. याने घशाला आराम मिळेल.

यप्रमाणेच लिंबाचा रस आणि मध टाकलेले गरम पाणी प्यायल्यानेही घशाला आराम मिळतो. लवंग चघळल्यानेही घसादुखी कमी होते. थंडीत तुम्हाला जर तुम्हाला घसादुखीचा त्रास उद्भवत असेल तर हे उपाय नक्कीच मदत करतील.

# शाळा गाठणाऱ्या विद्यार्थ्यांना एसटी दिलासा देणार

## शालेय विद्यार्थ्यांसाठी हेल्पलाइन... एसटी बस रद्द झाल्यास मिळणार तत्काळ मदत

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

एसटी बसमधून शाळा–महाविद्यालयांत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना लवकरच दिलासा मिळणार आहे. एसटी प्रवासात काही अडचण आल्यास, एसटी बसेस वेळेवर न आल्यास अथवा अचानक रद्द झाल्यास त्यांना योग्य ती मदत मिळावी, यासाठी लवकरच एसटी महामंडळ हेल्पलाइन सुरू करणार आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या शालेय नुकसानीला आगार व्यवस्थापक जबाबदार असणार आहेत.

राज्य शासनाच्या समाजकल्याण विभागाकडून मानव विकास निधी अंतर्गत राजाच्या दुर्गम व आदिवासीबहुल भागामध्ये शालेय विद्यार्थिनींना प्रवासी सेवा देण्यासाठी मानव विकास बस उपलब्ध करून दिलेल्या आहेत. बस शालेय विद्यार्थिनींची वाहतूक करण्यासाठी वापरण्यात याव्यात, अशा सूचना असतात. परंतु अनेक आगारात या नियमाची पायमल्ली होते. परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी धाराशिव मध्यवर्ती बसस्थानकाला भेट दिली. यावेळी उपस्थित शालेय विद्यार्थी–विद्यार्थिनींनी याबाबत अनेक समस्या व तक्रारी मंत्र्यांकडे मांडल्या. अनेक शालेय बस वेळेवर न सुटणे, गर्दी असल्यामुळे थांब्यावर न थांबणे, बस उशिरा येणे अथवा अचानक रद्द होणे यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याची तक्रार काही विद्यार्थ्यांनी केली. संध्याकाळी शाळा–महाविद्यालय सुटल्यानंतर किमान एक तासात मुले घरी जाणे अपेक्षित असते. मात्र बस वेळेवर न आल्याने अथवा अचानक रद्द झाल्याने मुलांना घरी पोहोचण्यास उशीर होतो. अनेक ठिकाणी गैरसमजातून पालकांनी विद्यार्थ्यांना उशिरा येण्याबद्दल शिक्षाही दिल्या आहेत. याबाबत स्थानिक एसटी प्रशासनाने गांभीयार्ने घेणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन सरनाईक यांनी केले.

शालेय विद्यार्थी–विद्यार्थिनींना घरातून शाळेत जात असताना अथवा शाळेतून घरी येत असताना बस उशिरा सुटणे, त्या अचानक रद्द होणे, तांत्रिक बिघाडामुळे बस नादुरुस्त झाल्याने घरी पोहोचण्यास अडचण निर्माण झाल्यास त्यांनी एसटीच्या हेल्पलाइन क्रमांकवर संपर्क करून मदत घ्यावी, या – हेतूने एक हेल्पलाइन क्रमांक प्रदर्शित करण्यात येईल. ३१ विभागातील सर्व विभाग नियंत्रकांचे संपर्क क्रमांक संबंधित शाळा, महाविद्यालयांना देण्यात येतील जेणेकरून आपत्कालीन परिस्थितीमध्ये महाविद्यालयाचे शाळा प्राचार्य, मुख्याध्यापक, थेट विद्यार्थी विद्यार्थ्यांनीदेखील विभाग नियंत्रकांना संपर्क करून आपल्या समस्या मांडू शकतात, अशी माहिती परिवहन मंत्री सरनाईक यांनी दिली.



**विद्यार्थ्यांच्या शालेय नुकसानीची जबाबदारी आगार व्यवस्थापकावर**

एसटी बस उशिरा सुटणे, अचानक रद्द होणे अथवा अन्य कारणामुळे शालेय विद्यार्थी-विद्यार्थिनींचे तास चुकतात किंवा परीक्षेला ते वेळेवर पोहोचू शकत नाहीत. काही वेळेला त्यांची महत्त्वाची परीक्षादेखील बुडते. विद्यार्थ्यांच्या अशा शालेय नुकसानीला संबंधित क्षेत्रातील आगार व्यवस्थापक व त्यांचे पर्यवेक्षक यांना जबाबदार धरण्यात येईल. बस फेऱ्यांच्या गैरव्यवस्थापनामूळे विद्यार्थ्यांचे जितक्या दिवसाचे शालेय नुकसान होईल, तितके दिवस यास जबाबदार असणारे पर्यवेक्षक अथवा अधिकाऱ्यांना निलंबित अथवा सक्तीचे रजेवर पाठवण्यात यावे, असे निर्देश सरनाईक यांनी दिले आहेत.

### कराडमध्ये मानवी साखळीतून 'VOTE' शब्दाची रचना

## ५०० विद्यार्थ्यांचा मतदान जागृतीत सहभाग




■कराड। प्रतिनिधी,

सार्वत्रिक कराड नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार जागृतीसाठी स्वीप उपक्रमांतर्गत कराड येथील यशवंत हायस्कूलने मतदानाविषयी सजगता निर्माण करणारा अभिनव उपक्रम राबवला. शाळेच्या मैदानावर तब्बल ५०० विद्यार्थ्यांनी मानवी साखळी तयार करून 'VOTE' हा शब्द साकारला, तर त्यानंतर शहरात रॅली काढून सर्वांना मतदानासाठी प्रोत्साहित केले. मुख्याध्यापक सुनील महामुलकर यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबवण्यात आला. या कार्यक्रमासाठी शाळेतील सर्व शिक्षकांनी समन्वय साधत परिश्रम घेतले. या उपक्रमाला स्वीप पथकातील सुनील परीट, आनंदराव जानुगडे, ऋषिकेश पोटे, संतोष डांगे, आदी अधिकारी उपस्थित होते. विद्यार्थ्यांसह पालकांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. या प्रसंगी आनंदराव जानुगडे यांनी विद्यार्थ्यांकडून मतदान जागृतीची प्रतिज्ञा घेतली. तर सुनील परीट यांनी विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांना मतदानासाठी प्रवृत्त करावे आणि स्वतः मतदान करण्याची शपथ द्यावी, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक मुख्याध्यापक महामुलकर यांनी केले.

## पालघरमध्ये निर्जनस्थळी घेऊन गेला अन् ओढणीने गळा दाबून हत्या!




■पालघर। प्रतिनिधी,

१३ नोव्हेंबर रोजी पालघर जिल्ह्यातील मुंबई–वडोदरा महामार्गावरील पुलाच्या बांधकामाच्या ठिकाणी महिलेचा मृतदेह आढळून आला होता. आता पोलिसांनी २५ वर्षीय महिलेच्या हत्येसंदर्भात खुलासा केला आहे. पोलिसांनी मृत महिलेचा ४३ वर्षीय पती साकीर अली मुस्तफअली मन्सूरी याला अटक केल्याची माहिती आहे. आरोपी पती मूळचा उत्तर प्रदेशचा असून तो सध्या गुजरातमधील सुरत येथे ड्रायव्हर म्हणून काम करतो. पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपीला त्याच्या पत्नीच्या चारित्र्यावर संशय होता आणि याच संशयातून पतीने आपल्या पत्नीची हत्या केली. पोलीस अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, एका हायवेजवळ संबंधित महिलेचा मृतदेह संशयास्पद स्थितीत आढळला. महिलेचा खून तिच्याच स्कार्फने गळा दाबून करण्यात आला असल्याचं प्राथमिक तपासात दिसून आलं. या आधारे, अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम १०३(१) (खून) अंतर्गत गुन्हा दाखल करून तपास सुरू करण्यात आला. तपासाच्या सुरुवातीला कोणतेही ठोस पुरावे मिळाले नसल्याने, पोलिसांनी बरीच पथके तयार केली. त्यांनी मृत महिलेचा फोटो सर्वत्र पाठवण्यात आला आणि त्यानंतर तिच्या कुटुंबियांनी पुढे येऊन तिची ओळख पटवली. ओळख पटल्यानंतर, पोलीस तपासात मृत महिलेच्या कौटुंबिक संबंधांवर आणि तिच्या पतीच्या वागण्यावर लक्ष ठेवण्यात आलं.

**पत्नीवर विवाहबाह्य संबंधाचा संशय**

तपासादरम्यान, पीडित महिलेचा पती साकीर अली हा घटना घडल्यापासून बेपत्ता असल्याचं आढळून आलं. पोलिसांनी त्याचं लोकेशन शोधून काढले आणि सोमवारी महाराष्ट्र–गुजरात सीमेवरील अछाड परिसरात त्याला अटक करण्यात आली. चौकशीदरम्यान, आरोपीने कबूल केलं की तो त्याला त्याच्या पत्नीवर अनैतिक संबंधाचा संशय होता आणि तो सतत तिचे विवाहबाह्य संबंध असल्याचा आरोप करत होता. या संशयातूनच आरोपी पतीने महिलेची निर्घृण हत्या केली. पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपीने आपल्या पत्नीची हत्या अगदी पूर्वनियोजित पद्धतीने केली होती. आरोपी पीडित महिलेला कोणत्या तरी बहाण्याने हायवेजवळील निर्जन स्थळी घेऊन गेला आणि तिथे तिच्याच ओढणीने गळा दाबून तिची हत्या केली. हत्येनंतर, आरोपी तिथून फरार झाला. सध्या, पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतलं असून प्रकरणाचा खोल तपास केला जात आहे.

# शाळांमध्ये 'माजी विद्यार्थी संघ' अनिवार्य

## इयत्ता १ ते १२ वीपर्यंतच्या शाळा–महाविद्यालयांना शासनाचे निर्देश

■उल्हासनगर। प्रतिनिधी,

उल्हासनगरातील सर्व प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमध्ये आता माजी विद्यार्थी संघ स्थापन करणे अनिवार्य ठरणार आहे. राज्य शासनाच्या नव्या आदेशानुसार शाळेच्या प्रगतीत माजी विद्यार्थ्यांचा सहभाग अधिक मजबूत करण्यासाठी आणि शैक्षणिक तसेच भौतिक विकासाला नवी दिशा देण्यासाठी उल्हासनगर महापालिका शिक्षण विभागाने सर्व शाळांना तातडीने संघ स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत. शाळेच्या घडणीमुळे मोठ्या पदांवर आणि विविध क्षेत्रांत झळकणारे असंख्य माजी विद्यार्थी आता पुन्हा आपल्या शाळेशी अधिक दृढ नात्याने जोडले जाणार आहेत. उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण विभागाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत शहरातील सर्व व्यवस्थापनांच्या प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांना माजी विद्यार्थी संघ स्थापन करण्याचे आदेश जारी केले आहेत. या पार्श्वभूमीवर उल्हासनगर महापालिका शिक्षण विभागाने सर्व शाळांना निर्देश दिले आहेत की, इयत्ता १ ते १२ या एकत्रित स्तरावर माजी विद्यार्थ्यांना एकत्र करून माजी विद्यार्थी संघ स्थापन करावा आणि त्याचा अहवाल तातडीने शिक्षण विभागाकडे सादर करावा.




शाळा ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण घडणीची प्रथम पायरी आहे. शाळेतील ज्ञान, संस्कार आणि मूल्यांमुळे तयार झालेली पिढी आज प्रशासन, राजकारण, शेती अशा विविध क्षेत्रांत राज्यभर उत्तुंग स्थान मिळवताना दिसते. छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर, अहमदनगर अशा अनेक जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांनी शाळेच्या योगदानात भर दिला आहे.

**माजी विद्यार्थी संघाकडून अपेक्षित योगदान**

- शाळेतील भौतिक व पूरक सुविधा विकसित करण्यासाठी मार्गदर्शन व सहकार्य.
- शैक्षणिक दर्जा, विद्यार्थी गुणवत्ता व कौशल्यविकासासाठी सहकार्य.
- पालकांमध्ये शाळेचे महत्त्व आणि भावनिक नाते दृढ करणे.
- अर्थिक पारदर्शकतेसाठी रोख रक्कम न स्वीकारता आवश्यक सुविधा/वस्तुरूप मदत देण्यावर भर.

**परीक्षेत सुरक्षा व्यवस्था अधिक कडक**

परीक्षा केंद्रात प्रवेश करताना सर्व परीक्षार्थींची मेटल डिटेक्टरच्या सहाय्याने तपासणी (फ्रिस्किंग) करण्यात येणार आहे. कोणताही विद्यार्थी मोबाईल, स्मार्टवॉच, कॅल्क्युलेटर व इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे घेऊन जाणार नाहीत, याची विशेष काळजी घेतली जाणार आहे. टीईटी परीक्षेत होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी यंदा राज्य परीक्षा परिषदेने काटेकोर उपाययोजना राबविल्या आहेत, असेही त्यांनी म्हटले.

### टीईटी परीक्षेसाठी ४ लाख ७५ हजारांहून अधिक नोंदणी

## गैरप्रकार रोखण्यासाठी सीसीटीव्ही सह एआय तंत्रज्ञानाचा वापर


■पुणे। प्रतिनिधी,

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने रविवारी (दि. २३) राज्यभरात शिक्षक पात्रता परीक्षा अर्थात 'टीईटी' घेण्यात येणार आहे. या परीक्षेला तब्बल ४ लाख ७५ हजार ६६९ उमेदवारांनी नोंदणी केली आहे. परीक्षेत कुठलाही अनुचित प्रकार होऊ नये म्हणून अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने केंद्रांवर नियंत्रण ठेवले जाणार असून, राज्यातील १ हजार ४२२ केंद्रांवर परीक्षा होणार असल्याची माहिती परीक्षा परिषदेचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार बेडसे यांनी दिली.

इयत्ता पहिली ते पाचवी आणि सहावी ते आठवी या वगार्तील शिक्षकांना टीईटी परीक्षा अनिवार्य आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही मोठ्या संख्येने उमेदवारांनी परीक्षेस प्रतिसाद दिला आहे. पहिली ते पाचवीसाठी पेपर भाग १, तर सहावी ते आठवीसाठी पेपर भाग २ असणार आहे.

सिंधुदुगार्तून सर्वात कमी उमेदवार

पेपर भाग १ साठी २ लाख ३ हजार ३३३ उमेदवारांनी नोंदणी केली असून, पेपर भाग २ साठी २ लाख ७२ हजार ३३५ उमेदवारांनी नोंदणी केली आहे. पेपर भाग १ आणि २ दोन्ही परीक्षांसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांची संख्या २ लाख २८ हजार २०० इतकी आहे. पेपर भाग १ ची परीक्षा ५६९ केंद्रांवर, तर पेपर भाग २ ची परीक्षा ८५१ केंद्रांवर होणार आहे. नोंदणी केलेल्या उमेदवारांमध्ये पुणे जिल्ह्यातून सर्वाधिक ३७हजार २९३ अर्ज, तर सिंधुदुर्ग जिल्ह्यातून सर्वात कमी २ हजार ४२३ अर्ज प्राप्त झाले आहेत.



"परीक्षेतील गैरप्रकार टाळण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचा वापर करून देखरेख ठेवण्यात येणार आहे. तसेच टीईटी घोटाळ्याशी संबंधित उमेदवारांना यंदाच्या परीक्षेला प्रवेशबंदी करण्यात आली आहे. त्यामुळे अशा उमेदवारांना अर्ज नोंदणी करता आली नाही. गतवेळी झालेल्या परीक्षेत टीईटी घोटाळ्यातील बहुतांश उमेदवारांनी परीक्षा दिली होती. त्या सर्व उमेदवारांचा निकाल राखून ठेवण्यात आला आहे."

डॉ. नंदकुमार बेडसे, अध्यक्ष परीक्षा परिषद

# फ्लॅटमध्ये सापडला प्रचंड शस्त्रसाठा

## ऐन निवडणुकीआधी 'ही' नेमकी कसली तयारी?

डोंबिवली :

आगामी महापालिका निवडणुकीपूर्वी कल्याण गुन्हे शाखा युनिट 3 ने चार दिवसांपूर्वी डोंबिवली पूर्वेतील देसले पाडा येथील गोकुळधाम टॉवर येथील एका फ्लॅटवर छापा टाकला आणि मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर शस्त्रांचा साठा जप्त केला. या कारवाईत, गुन्हे शाखेने ३६ वर्षीय सराईत गुन्हेगार रोशन झा याला अटक केली.

**नेमकी कोणकोणती शस्त्र पोलिसांनी केली जप्त?**

छाप्यादरम्यान पोलिसांनी २,१२,५०० रुपयांची बेकायदेशीर शस्त्रे जप्त केली, ज्यात ३ देशी बनावटीचे पिस्तूल, ३ जिवंत काडतुसे, २ रिकामे मॅगझिन, २ खंजीर, ४ धारदार चाकू आणि १ तलवार यांचा समावेश आहे. मानपाडा पोलीस ठाण्यात रोशन झा याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे आणि आरोपीकडे अजूनही शस्त्रे असण्याची शक्यता वर्तवली जात आहे पोलीस अधिक तपास करत आहे.

कल्याण गुन्हे शाखेचे पोलिसकर्मी दत्ता भोसले यांना डोंबिवलीतील देसले पाडा येथील गोकुळधाम टॉवरमधील एका फ्लॅटमध्ये बेकायदेशीर शस्त्रे लपवून ठेवल्याची माहिती मिळाली. माहितीची खात्री पटल्यानंतर, गुन्हे शाखेच्या युनिट–३ च्या पथकाने तात्काळ छापा टाकून कारवाई केली. काही दिवसांवर महापालिका निवडणुका येत असल्याने, डोंबिवलीतील एका फ्लॅटमध्ये इतक्या मोठ्या प्रमाणात शस्त्रे सापडणे हा पोलीस आणि सुरक्षा यंत्रणांसाठी चिंतेचा विषय बनला आहे.

येणाऱ्या महापालिका निवडणुकीच्या दृष्टीने ही कारवाई महत्त्वाची आहे. ही शस्त्रे कोणत्याही राजकीय नेत्याशी किंवा आगामी निवडणुकांशी संबंधित आहेत का, असे प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. गुन्हे शाखेचे पथक आता शस्त्रे कुठून आली, ती कोणापर्यंत पोहोचायची होती आणि त्यांचा निवडणुकीच्या काही संबंध आहे का याचा तपास करत आहे. असे म्हटले जाते की आरोपी रोशनकडे आणखी शस्त्रे असण्याची शक्यता आहे, पुढील तपास सुरू आहे.

कल्याण गुन्हे शाखेने १३ नोव्हेंबर रोजी कारवाई करून आरोपीला अटक केली होती, परंतु चार दिवसांनी पत्रकार परिषद घेतल्याने कल्याण गुन्हे शाखेचे पथकावर प्रश्न उपस्थित केले जात आहे.




# 'बागेश्वर धामचा प्रसाद' म्हणत गुंगी देऊन २४ लाखांची फसवणूक

■उल्हासनगर। प्रतिनिधी,

उल्हासनगरात धार्मिक श्रद्धेचा गैरवापर करत एका वृद्ध महिलेला तब्बल दीड वर्षे योजनाबद्ध पद्धतीने २४.६० लाखांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. 'बागेश्वर धामचा प्रसाद', 'विघ्न दूर करणारा बाबा', 'विशेष पूजांचे उपाय' अशा आमिषांवर विश्वास बसवून गुंगीकारक मिठाई देऊन सोन्याची बांगडी चोरण्यापर्यंत पोहोचलेल्या या टोळीला विठ्ठलवाडी पोलिसांनी अवघ्या काही तासांत अटक केली. या प्रकरणाने धार्मिक नावाखाली सक्रिय असलेल्या फसवणूक रॅकेटचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. उल्हासनगर कॅम्प ४ मधील साई मेहरवान पॅलेस येथे राहणाऱ्या वृद्ध फियार्दी शकुंतला आहुजा यांची जानेवारी २०२३ ते ११ नोव्हेंबर २०२५ या काळात आरोपींनी टप्प्याटप्प्याने फसवणूक केली. सुरुवातीला करिष्मा दुधाणीने "रूम मिळवून देतो" असा बहाणा करून १० लाख रुपये घेतले. त्यानंतर करिष्मा, उषा शर्मा, लावीना शर्मा, साहिल दुधानी आणि यश शर्मा या पाच जणांनी मिळून धार्मिक विधी, विशेष होमहवन, 'विघ्न दूर करणारा बाबा', 'बागेश्वर धामचा प्रसाद' अशा नावाखाली फियार्दीचा पूर्ण विश्वास संपादन केला आणि एकूण ८ तोळे सोनं, १० ग्रॅम हिरे आणि रोख रक्कम मिळून २४.६० लाखांचा मुद्देमाल हस्तगत केला.

# पोटच्या मुलीवर ३ वेळा बलात्कार...

## नराधम बापाला न्यायालयाकडून १७८ वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा!

■मुंबई। प्रतिनिधी,

बाप आणि मुलीच्या नात्याला काळीमा फासणारी धक्कादायक बातमी समोर आली आहे. केरळमध्ये वडिलांनीच आपल्या ११ वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याचं वृत्त आहे. मंजेरी येथील एका पोक्सो न्यायालयाने आपल्या ११ वर्षांच्या मुलीवर बलात्कार केल्याप्रकरणी ४० वर्षीय वडिलांना १७८ वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली आहे. यासंबंधी न्यायाधीश एएम अशरफ यांनी आरोपीला ११ लाख रुपयांचा दंडही ठोठावला असल्याची माहिती आहे.

**आपल्याच मुलीवर तीन वेळा बलात्कार**

प्रकरणातील आरोपी व्यक्तीने जानेवारी २०२२ ते जानेवारी २०२३ दरम्यान आपल्याच घरात त्याच्या अल्पवयीन मुलीवर तीन वेळा बलात्कार केला. इतकेच नव्हे तर, पीडितेने तिच्या वडिलांच्या घाणेरड्या कृत्याबाबत कोणाला सांगितलं तर तिला ठार मारण्याची धमकी सुद्धा त्याने दिली. आता, न्यायालयाकडून आरोपी वडिलांना पॉक्सो कायद्याच्या गंभीर कलमांखाली ४० वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली आहे.

**४० वर्षांचा तुरुंगवास**

आरोपी व्यक्तीला हल्ला आणि गुन्हेगारी धमकी दिल्याबद्दल पाच वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली, तसेच स्वतःच्या अल्पवयीन मुलीला ओलीस ठेवल्याबद्दल तीन वर्षांची वेगळी शिक्षा सुनावण्यात आली. वेगवेगळ्या गुन्ह्यांबाबत सर्व शिक्षा एकाच वेळी चालतील. याचा अर्थ असा की त्याला किमान ४० वर्षांचा तुरुंगवास भोगावा लागेल. तसेच, जर तो दंड भरण्यात अयशस्वी झाला तर त्याला अतिरिक्त १८ महिने शिक्षा होईल.

**अपंग महिलेवर सुद्धा केला बलात्कार**

या प्रकरणातील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे संबंधित आरोपी ऑक्टोबर २०२१ मध्ये एका अपंग महिलेवर बलात्कार केल्याबद्दल आणि फेब्रुवारी २०२२ मध्ये पुन्हा तिच्यावर बलात्कार करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी २० वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा भोगत आहे. आरोपी त्याच प्रकरणात जामिनावर बाहेर होता आणि त्याने लगेचच त्याच्या ११ वर्षांच्या मुलीला वासनेचं बळी बनवलं.

# पेढ्यातून गुंगीचे औषध दिलं, मुख्याध्यापकाचा महिलेवर अत्याचार

■धुळे। प्रतिनिधी,

धुळे शहरात महिलेला गुंगीचे औषध देऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार करून, त्या कृत्याचा व्हिडिओ चित्रीत करत तब्बल 60 लाखांच्या आसपास रक्कम उकळल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. पीडितेने शुक्रवारी पश्चिम देवपूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी आरोपी मुख्याध्यापकाला ताब्यात घेतले आहे. सुकलाल रामभाऊ बोरसे (वय 53, रा. विवेकानंदनगर, देवपूर) असे आरोपीचे नाव आहे.

ओळखीचा गैरफायदा घेत भयंकर कृत्य

तक्रारीनुसार, बोरसे आणि पीडित महिलेची ओळख काही काळापूर्वी झाली होती. आर्थिक अडचणींमध्ये बोरसे याने मदत केली आणि त्यातून त्यांच्या संपर्कात वाढ झाली. याच जवळीकपणाचा फायदा घेऊन 17 ऑगस्ट 2023 रोजी दुपारी साडेबाराच्या सुमारास बोरसे याने महिलेला पेढ्यातून आणलेले गुंगीचे औषध दिले. औषधाचा परिणाम झाल्याने महिला बेशुद्ध पडली आणि त्या अवस्थेत तिच्यावर अत्याचार करण्यात आला. याच वेळी बोरसे याने संपूर्ण घटना आपल्या मोबाईलवर रेकॉर्ड केली.

व्हिडिओचा वापर करून ब्लॅकमेलिंग

अत्याचारानंतर आरोपीने व्हिडिओ सार्वजनिक करण्याची धमकी देत पीडितेला आर्थिकदृष्ट्या त्रास देणे सुरू केले. त्याच्या धमक्या आणि दबावामुळे पीडितेला वेळोवेळी मोठी रक्कम देण्यास भाग पाडण्यात आले. या पद्धतीने आरोपीने सुमारे 59 लाख 99 हजार 400 रुपये घेऊन पीडितेची आर्थिक लूट केली. केवळ पैसेच नाही, तर धमकी कायम ठेवण्यासाठी बोरसे याने तिच्या सहीचे पाच ते सहा ब्लँक चेकही स्वतःकडे घेतले.

पोलिसांत धाव, आरोपीला तातडीची अटक

दीर्घकाळ चाललेल्या त्रासामुळे अखेर पीडित महिलेने धीर एकवटत पश्चिम देवपूर पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवली. तक्रारीचे गांभीर्य लक्षात घेत पोलिसांनी रात्रीच मुख्याध्यापक सुकलाल बोरसे याच्याविरोधात गुन्हा नोंदवून त्याला बेड्या ठोकल्या. पुढील तपास पोलिस निरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. या घटनेने धुळे शहरात मोठी खळबळ उडाली असून, एका जबाबदार पदावरील व्यक्तीकडून असा अमानवीक कृत्य केल्याने संताप व्यक्त केला जात आहे.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक – डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय – गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक – डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी – ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com